बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार दि.२१ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

## पुणेकरांनो सावध रहा, खडकवासलाचे उघडले दरवाजे

पुणे (प्रतिनिधी): पुण्यामध्ये पावसाचा जोर वाढला असून, शहरातील अनेक भागांमध्ये संततधार पाऊस सुरू असून सखल भागात पाणी साचू लागले आहे. दुसरीकडे घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढल्याने खडकवासला धरणाचे पाच दरवाजे उघडण्यात आले आहे. २००० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून नदीकाठच्या भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणक्षेत्रात पावसाचा जोर वाढला आहे. मागील २४ तासांत खडकवासला धरणात १८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. गुरुवारी दुपारी दीडच्या सुमारास धरणाचे पाच दरवाजे उघडण्यात आले. २ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून यंदाचा मोसमात धरणणातून प्रथम पाण्याचा विसर्ग झाला. स्थितीत खडकवासला प्रकल्पामध्ये ५.२५ टीएमसी पाणीसाठा आहे.

घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढल्याने नदीकाठ परिसरातील वाहने आणि जनावरे सुरक्षित स्थळी नेण्यात यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका असल्याने प्रशासन व आपत्कालीन यंत्रणांकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पाण्याचा विसर्ग होण्यापूर्वी नदीपात्रात सायरन वाजवत अलर्ट देण्यात आला. महापालिकेकडून नदीपात्रांमध्ये सायरन बसवण्यात आले असून खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग होण्यापूर्वी नागरिकांना याबाबत सूचना मिळावी म्हणून सायरनद्वारे इशारा दिला जातो.

**भिडे पुलावरील वाहतूक बंद :** शहरात दिवसभर मुसळधार पाऊस पडल्यामुळे पुण्यातील भिडे पुलाच्या काठोकाठ पाणी वाहत असल्याचे पाहायला मिळाले. खडकवासला धरणात परिसरात मुसळधार पाऊस पडल्यामुळे भिडे पुलावरून पाणी वाहण्याची शक्यता पाहता दोन्हीकडील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

# धो-धो पावसाने पुणे, नाशिकला झोडपले

**दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पाणी**



नाशिक (प्रतिनिधी) :

नाशिकमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पात्रात कमालीची वाढ झाली आहे. नदीतील वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे दुतोंड्या मारुती कंबरे इतका पाण्याखाली गेला आहे. पातळेश्वर मंदिर अर्धे पाण्याखाली गेले आहे, तर बाजारपेठ परिसरात पाणी जाण्यास सुरुवात झाली आहे. भाजी विक्रेते, फळ विक्रेतांची दुकाने सुरक्षितस्थळी हलवली जात आहेत. तसेच दारणा धरण ५० टक्के भरल्याने गुरुवारी दुपारी ३ वाजता धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यास सुरुवात झाली आहे. मुसळधार पावसामुळे गोदावरी नदी दुथडी भरून वाहू लागली आहे.

हवामान खात्याने गुरुवारी नाशिकसाठी 'यलो अलर्ट' जारी केला होता, याशिवाय पुढील काही तासांत पावसाचा जोर कायम राहण्याचा इशारा दिला आहे. पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत सकाळीच पाणी पोहोचले आहे. पातळेश्वर मंदिराचाही काही भाग आता पाण्याखाली गेला आहे. गुरुवारी संततधार पाऊस पडल्यामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने नदीकाठी असलेल्या फेरीवाल्यांच्या दुकानांतून पाणी वाहू लागले होते.

### 'दारणा'तून यंदाचा पहिला विसर्ग होणार
### मुसळधारेमुळे गोदावरीच्या पात्रात कमालीची वाढ

**दारणा धरणातून पाण्याचा विसर्ग :** नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. मागील दोन ते तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे दारणा धरणाच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून धरण ५० टक्के क्षमतेने भरले आहे. दारणा पॉवर हाऊसमधून सुमारे ११०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले आहे. सततच्या पावसामुळे खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. दारणा नदीकाठच्या गावातील नागरिकांना प्रशासनाने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

**टँकर बंद करण्याचा निर्णय**

दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळख असलेल्या येवला तालुक्यात एप्रिल आणि मे महिन्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाल्याने प्रशासनाने ३० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला होता. तालुक्याच्या उत्तर पूर्व भागातील राजापूर ममदापूर नगरसूल देवठाण-भुलेगाव या प्रमुख गावातील वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा होत होता; परंतु भरपूर प्रमाणात पाऊस झाल्याने प्रशासनाने टँकर बंद करण्याचा निर्णय घेतला. नाशिकच्या येवला तालुक्यात एप्रिल आणि मे महिन्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली होती.

**त्र्यंबकेश्वरमध्येही मुसळधार पावसाचा जोर**

त्र्यंबकेश्वर परिसरात देखील काल संध्याकाळच्या सुमारास मुसळधार पावसाने हजेरी लावली. अवघ्या तासाभरात झालेल्या जोरदार पावसामुळे गावातील सखल भागात पाणी साचले आणि रस्त्यांनी अक्षरशः नदीचे स्वरूप धारण केले. पावसामुळे कुशावर्त तीर्थ आणि त्र्यंबकेश्वर मंदिरासमोरील रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले होते, त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शहरातील अनेक रस्ते पूर्णतः जलमय झाले होते. पावसामुळे वाहतूकही विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळाले.



**बाजारपेठ आणि व्यापाऱ्यांवर परिणाम :** गोदावरी घाटालगतची बाजारपेठ देखील आता पाण्याच्या विळख्यात सापडण्याच्या मार्गावर आहे. फळ विक्रेते व भाजी विक्रेत्यांनी आपले स्टॉल उचलून सुरक्षित ठिकाणी हलवण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी दुकानांमध्ये पाणी शिरू लागल्याचेही वृत्त आहे. व्यापाऱ्यांनी स्वतःहून खबरदारी घेत आपला माल हलवण्यास सुरुवात केली होती.

# श्री क्षेत्र भंडारा डोंगरावरील तुकोबांचे मंदिर आकर्षण ठरणार

### पीडीसी बँकेच्या माध्यमातून पाच कोटींचा निधी देण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आश्वासन

जुन्नर (प्रतिनिधी) :

शासकीय मदतीशिवाय वारकरी आणि सर्वसामान्य यांच्या योगदानातून श्री क्षेत्र भंडारा डोंगरावर उभारले जात आहे. तुकोबांचे मंदिर भाविकांसाठी धार्मिक आणि सांस्कृतिक अध्यात्मिक केंद्र ठरणार आहे. मंदिर बांधकामासाठी सर्वोतोपरी मदत करणार आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मध्यमातून पाच कोटींचा निधी देऊ असे आश्वासन उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. अप्रतिम आणि दिव्य मंदिर हजारो वर्षे टिकू शकेल. अयोध्येतील श्री राम मंदिरानंतर वारकरी संप्रदायाचे हे मंदिर आकर्षण असणार आहे. संत तुकाराम महाराजांची चरित्र हे भक्ती आणि वैराग्य सामाजिक समतेचा मूर्तिमंत आदर्श असल्याने त्यांनी यावेळी सांगितले आहे.

श्री क्षेत्र देहू येथील संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन आणि प्रस्थान सोहळा झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तुकोबारायांचे चिंतनस्थळ भंडारा डोंगरास सदिच्छा भेट दिली. यावेळी ते बोलत होते. श्रीक्षेत्र भंडारा डोंगर पायथ्याशी असलेल्या सव्वाशे एकर गायरान जमीन ताब्यात घेऊन वारकऱ्यांच्या सोयीसाठी सरकारतर्फे कॉरिडॉर विकसित केला जाईल. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे अजित पवार यावेळी म्हणाले आहेत.



**अयोध्येत सर्वप्रथम गावडे महाराजांचे कीर्तन**

बांधकामाची माहिती घेत नियोजित मंदिर परिसराचे नियोजन, रचना याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी माहिती जाणून घेतली. संत तुकाराम महाराजांचे कार्य, विचार, वारसा अखंडपणे पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे, मंदिराची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी पवार यांनी सूचना केल्या. भंडारा डोंगरावरील संत तुकाराम महाराजांच्या मंदिर निर्मितीसाठी ह.भ.प पंकज महाराज गावडे यांच्यासह अनेक संत मंडळी आपले योगदान देत असून अयोध्येतील राम मंदिरामध्ये सर्वप्रथम पंकज महाराज गावडे यांचे कीर्तन झाले आहे.

# आळंदीत इंद्रायणीला पूर

### घाटावरील सर्व मंदिरे, पोलिसांचे स्वागत कक्ष, महिलांचे चेंजिंग रूम गेले पाण्याखाली



पुणे (प्रतिनिधी) :

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पूर्वसंध्येला आळंदी आणि परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने इंद्रायणी नदीने रौद्र रूप धारण केले आहे. इंद्रायणी नदीला मोठा पूर आला असून, ती दुथडी भरून वाहू लागली आहे. या पूरस्थितीमुळे घाटावरील सर्व मंदिरे, पोलिसांचे स्वागत कक्ष आणि महिलांसाठी असलेले चेंजिंग रूम पाण्याखाली गेले असून प्रसिद्ध भक्ती-सोपान पूलही पाण्याखाली गेल्याने परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

इंद्रायणीच्या पाण्याची पातळी धोकादायक पातळीवर पोहोचली असून, पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान आणि अक्राळविक्राळ बनला आहे. पुराच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात जलपर्णीही वाहत येत आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करत नदीघाट पूर्णपणे बंद केला असून, भाविकांना घाटावर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने इंद्रायणी नदीच्या घाटावर मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जीवरक्षक पथके सज्ज ठेवण्यात आली असून, नदीपात्रात दोन बोटीही तैनात करण्यात आल्या आहेत.

आळंदीत पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने भाविकांची गैरसोय होत आहे.

**ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान**

आळंदीतून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पायी वारी पालखी सोहळ्याचे गुरुवारी (दि.१९) पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल झाले होते. पहाटेपासूनच आळंदी आणि पंचक्रोशीत पावसाने दमदार हजेरी लावल्याने काहीशा अडचणी निर्माण झाल्या असल्या, तरी वारकऱ्यांचा उत्साह आणि श्रद्धा या सर्वांवर मात करताना पाहावयास मिळाला.



**विमानाची दुर्घटना टळली**

**नवी दिल्ली :** भुवनेश्वरहून कोलकाताला जाणाऱ्या इंडिगोच्या विमान ६ई-६१०१ ला भुवनेश्वरमधील बिजू पटनायक आंतरराष्ट्रीय विमानतळावर उड्डाण करण्यापूर्वी एका पक्ष्याने धडक दिली. वैमानिकाने तातडीने उड्डाण रद्द केले आणि सुरक्षित राहण्यासाठी आपत्कालीन ब्रेक लावले. विमानाचे नुकसान झाले आहे का याची तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रवाशांना किंवा कर्मचाऱ्यांना कोणतीही दुखापत झाली नाही.

# पंढरपुरात अजस्त्र वॉटरप्रूफ मंडपाची उभारणी

### सुमारे २५ ते ३० हजार भाविकांना होणार फायदा

पंढरपूर (प्रतिनिधी) :

यंदाच्या आषाढी वारीत पावसाच्या जोरदार सरींचा फटका बसत असतानाच वारी मार्गावरील सर्वात महत्त्वाचा टप्पा पंढरपुरातील दर्शन रांग यंदा भाविकांसाठी अधिक सुरक्षित आणि सुसज्ज करण्यात आली आहे. गोपाळपूर येथे ५०० बाय १५० फुटांचा भव्य वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. हा मंडप यंदा पहिल्यांदाच उभारण्यात आला असून, सुमारे २५ ते ३० हजार भाविक या मंडपात सुरक्षितपणे आणि कोरड्या अवस्थेत उभे राहून विठ्ठलाचे दर्शन घेऊ शकणार आहेत.

या वर्षीच्या आषाढी वारीत सुरुवातीपासूनच पावसाचा जोर कायम आहे. वारकऱ्यांच्या पालख्या आता पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाल्या आहेत. अशा परिस्थितीत, गोपाळपूर पत्रा शेड परिसरात उभारण्यात आलेला हा विशाल दर्शन मंडप भाविकांसाठी फार मोठा दिलासा ठरणार आहे. मंडप संपूर्ण वॉटरप्रूफ असून त्याची उंची जवळपास २० फूट ठेवण्यात आली आहे, जेणेकरून गर्दी असतानाही श्वसनास अडथळा होणार नाही.



**पांढऱ्या कापडाने सुशोभीकरण**

- मंडपाच्या आतून पांढऱ्या कापडाने सुशोभीकरण करण्यात आले असून, सर्वत्र पंख्यांचीही व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे वारकऱ्यांना ऊन आणि पावसापासून संरक्षण मिळणार आहे.
- दरवर्षी छोटे-छोटे मंडप उभारून त्यामधून दर्शन रांग ठरवण्यात येत असे. अशावेळी चेंगराचेंगरी आणि घुसखोरीचे प्रसंग वारंवार समोर येत असत. आता या विशाल दर्शन रांगेमुळे भाविक मोकळेपणाने देवाच्या दर्शन रांगेत उभे राहू शकणार आहेत.

# 'मुसळधारे'मुळे रायगडात परिस्थिती चिंताजनक!

**तीन नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी**

**तीन पर्यटन ठिकाणी जाण्यास बंदी**

**रस्त्यावर पाणी साचल्याने अलिबाग-रोहा रस्ता बंद**

पनवेल (प्रतिनिधी) :

रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे सगळीकडे पाणी साचून रस्ते बंद झाले आहेत. रायगड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. बुधवारी रात्री आणि गुरुवारीही जिल्ह्यात पावसाचा जोर वाढलेला असून, नदी-नाल्यांना पूर आला आहे. जिल्ह्यातील तीन नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. कुंडलिका, पाताळगंगा नदीला पूर आला आहे. प्रशासनाने कोणतीही दुर्दैवी घटना घडू नये म्हणून रायगड जिल्ह्यातील तीन पर्यटन ठिकाणी जाण्यास बंदी घातली आहे.



रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, तळा, महाड, पोलादपूरमध्ये अतिमुसळधार पाऊस झाला आहे. इतर भागातही अतिवृष्टीसदृश पाऊस झाला असून नद्यांना पूर आला आहे. रायगड जिल्ह्यातील अंबा नदी (नागोठणे बंधारा), कुंडलिका नदी (डोलवहाल बंधारा) पाताळगंगा या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. सावित्री नदीलाही पूर आला असून, अजून धोक्याची पातळी ओलांडलेली नाही. उल्हास नदी आणि गाढी नदीही धोक्याच्या पातळीपेक्षा कमी आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. बोर घर रस्त्यावर पाणी साचले असल्याने अलिबाग रोहा रस्ता बंद झाला आहे.

रायगड जिल्हा प्रशासनाने देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉइंट आणि ताह्मिणी घाट येथे जाण्यास बंदी घातली आहे. १७ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत ही बंद असणार आहे.

**रायगड जिल्ह्यातील शाळांना सुट्टी**

अलिबाग, तळा, पोलादपूर, रोहा, महाड या तालुक्यात जोरदार पाऊस पडत असल्याने येथील शाळा, महाविद्यालयांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सुट्टी जाहीर केली आहे. हवामान विभागाकडून अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्याने रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांतील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. अलिबाग, रोहा, तळा, महाड, पोलादपूर या तालुक्यातील सर्व शासकीय आणि खासगी शाळा, महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. पण, मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी वेळेत हजर राहून दिलेल्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे काम करावे, असे आदेश देण्यात आले आहेत.



**सोन्याचा भाव**

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १,०१,०८० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९२,६५० रुपये |



**चांदीचा भाव**

प्रति किलो ११२००० रुपये



गुरुवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात अखेरीस घसरणीचा पाढा कायम राहिला. निफ्टी कोसळल्यानंतरच त्याचे पडसाद बाजारात उमटले होते. सेन्सेक्स ८२.७९ अंकाने घसरत ८१३६१.८७ पातळीवर व निफ्टी ५० १८.८० अंकांने घसरत २४७९३.२५ पातळीवर स्थिरावला आहे. संपूर्ण दिवसात बँक निर्देशांकात घसरणीचे सत्र कायमच राहिले आहे.

### १६२४ पोलीस कर्मचारी, ११८७ होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात

# पालखी सोहळ्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस सज्ज

पुणे (प्रतिनिधी) :

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस दल सज्ज झाले असून पावणेदोन हजारांहून अधिक कर्मचारी व अधिकाऱ्यांचा बंदोबस्त तैनात केला आहे. महिलांसह वारकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली असून शीघ्र कृती दल (क्यूआरटी), बॉम्बशोधक व नाशक पथक, राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) तुकड्याही तैनात केल्या आहेत. वाहतुकीच्या आनुषंगाने बदल करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली. अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे या वेळी उपस्थित होते.

गिल म्हणाले, 'संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा रविवारी (२२ जून) उरुळीकांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत नायगांव फाटा येथे प्रवेश होणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे सासवड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये झेंडेवाडी येथे आगमन होणार आहे. दोन्ही पालखी सोहळ्याच्या मार्गावर अवजड वाहनांचा अडथळा होऊ नये, यासाठी १२ ठिकाणी विशेष पोलीस अधिकारी आणि वाहतूक अंमलदारांची नियुक्ती केली आहे. दोन्ही पालखी सोहळ्यात प्रत्येकी १५ अंमलदार हे साध्या वेषात कार्यरत राहणार आहेत.

**पोलीस सर्वेलन्स व्हॅनची नजर**

पालखी मार्गावर महिलांसह इतरांच्या सुरक्षिततेसाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी विशेष दक्षता घेतली आहे. पोलीस सर्वेलन्स व्हॅनद्वारे सीसीटीव्हीची नजर ठेवली जाणार आहे. पोलीस पथकासह अद्ययावत व्हॅन तैनात केल्या आहेत. पोलीस अंमलदार १ हजार ६२४, पोलीस अधिकारी १८३, होमगार्ड १ हजार १८७, एसआरपीएफ दोन कंपन्या, आरसीपीपथक, क्यूआरी प्रत्येकी दोन पथक तैनात केले आहेत.



पालखी सोहळ्याच्या आनुषंगाने पुणे ग्रामीण पोलीस दलाकडून बंदोबस्ताची जय्यत तयारी केली आहे. वारकऱ्यांसह महिलांच्या सुरक्षिततेची विशेष खबरदारी घेतली आहे. जागोजागी पोलीस बंदोबस्त, पर्यायी वाहतूक व्यवस्था, वेगवेगळ्या पथकांचा पोलीस बंदोबस्त सोहळ्यात बारकाईने लक्ष ठेवणार आहे.

**- संदीपसिंग गिल,** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

# वडील रागावल्याने मुलीची आत्महत्या

जळगाव (प्रतिनिधी) :

शहराला लागून असलेल्या खेडी हुडको परिसरातील सोळा वर्षीय मुलगी घरी उशिरा आल्याच्या कारणावरून वडिलांनी रागावल्याने आणि किरकोळ मारहाण केली. याचा राग मनात धरून अल्पवयीन मुलगी प्रज्ञा रवींद्र शिंदे (वय १६, रा. खेडी हुडको परिसर, जळगाव) हिने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना १९ जून रोजी दुपारी १२ वाजता उघडकीस आली.

प्रज्ञाचे वडील रवींद्र शिंदे हे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांना पत्नी, तीन मुली आणि दोन मुले असा परिवार आहे. १८ जून रोजी सकाळी प्रज्ञा घरातून कोणालाही काही न सांगता निघून गेली होती. रात्री ८ वाजता ती घरी परतल्यानंतर वडिलांनी तिला उशिरा येण्याबद्दल विचारले आणि किरकोळ मारहाण करत रागावले. याचा राग आल्याने प्रज्ञा पुन्हा घरातून कुणालाही काही न सांगता निघून गेली.

**पोलिसांकडून पुढील तपास सुरू**

या घटनेबाबत शनीपेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शनीपेठ पोलीस ठाण्याचे कर्मचारी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. प्रज्ञाच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी आणि दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेमुळे शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## अरण्यातले वनऋषी...

ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारूती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान-सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे मचकवाचांदणफ असो किंवा मनवेगाव बांधचे दिवसफ असो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले. कर्नाळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक मपक्षी जाय दिगंतरा.फ हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता. साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात मरानवाटाफ जसे आहे तसेच मरातवाफ आणि कितीतरी आहेत. सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी मपक्षी कोशफ लिहिला तसेच मवृक्ष कोशफ लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे मपक्षी कोशफ त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात.

# साहित्यिक प्रवासाची गौरवशाली दखल

अंबाजोगाई येथील ज्येष्ठ लेखक व विचारवंत, उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड यांच्या मडॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)फ या ग्रंथाला सन २०२३-२०२४ साठीचा राज्यस्तरीय ममहात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथफप्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल प्रा. गायकवाड यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. नुकतेच त्यांना याबाबतचे अधिकृत पत्र प्राप्त झाले आहे.

प्रा. गौतम गायकवाड यांना यापूर्वीही अनेक महत्त्वपूर्ण पुरस्कार प्राप्त झाले आहेत, जे त्यांच्या साहित्यिक योगदानाची साक्ष देतात. मव्हि. जे. आरकफ या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, मप्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्रफ या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम आणि मबुद्ध प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणाफ या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय मडॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीफतृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या याच मडॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)फ या ग्रंथास सन-२०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय मडॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीफ द्वितीय पुरस्कारही प्राप्त झाला आहे. एकाच संस्थेकडून सलग चार पुरस्कार मिळवणारे प्रा. गौतम गायकवाड हे एकमेव साहित्यिक ठरले आहेत, ही बाब अत्यंत उल्लेखनीय आहे.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांचे अध्यक्ष ॲड. एल. टी. सावंत, जनरल सेक्रेटरी प्रा. आर. आर. सोनकांबळे आणि ग्रंथ पुरस्कार निवड समितीचे चेअरमन डॉ. दीपक गायकवाड यांनी ही माहिती नुकतीच कळविली आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २२ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत पुणे येथील इतिहास संशोधन मंडळ, भरत नाट्य मंदिराशेजारी, सदाशिव पेठ येथे एका विशेष समारंभात करण्यात येणार आहे. या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून दैनिक सकाळ वृत्तपत्र मीडिया, पुणेचे निवासी संपादक दयानंद माने उपस्थित राहणार असून, माजी आमदार ॲड. एल. टी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडेल. फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथील उपप्राचार्य डॉ. प्रकाश पवार प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील. या सोहळ्यात प्रा. गौतम केरबा गायकवाड (प्रथम क्रमांक), जयराम सदाशिव खुने (द्वितीय क्रमांक) आणि बाबुराव नामदेव धांडोरे (तृतीय क्रमांक) या लेखकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार संस्थेचे कार्य मागील ३५ वर्षांपासून महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच भारतीय लोककल्याण कार्य आणि पुरोगामी विचार प्रसार व प्रसारासाठी अथकपणे कार्यरत आहे.



ही संस्था मागील अनेक वर्षांपासून महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या लेखकांकडून ग्रंथ मागवून, अभ्यासू व्यक्तींकडून त्याचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक जाहीर करते आणि पुरस्कार प्रदान करते. अशा उत्कृष्ट लेखकांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

प्रा. गौतम गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनीय कारकिर्दीची दखल या पुरस्कारांद्वारे घेतली जात आहे. यापूर्वीही त्यांना डॉ. जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभूषण पुरस्कार (सोलापूर) आणि उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) यांसारख्या विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या नावावर २२ हून अधिक पुस्तके असून, विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून त्यांचे नियमित प्रासंगिक लेखन प्रसिद्ध होते. त्यांनी दहापेक्षा अधिक ग्रंथांचे संपादनही केले आहे. यासोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रांमध्ये सहभाग घेत त्यांचे सव्वा तीनशेहून अधिक लेख विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक आणि कवींना प्रोत्साहन देण्याचे, तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्यही प्रा. गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. ते व्ही. जे. आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे अध्यक्ष आहेत, तसेच मपरिवर्तन संशोधनफमासिकाचे कार्यकारी संपादक म्हणूनही कार्यरत आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा मोठा पुढाकार असतो. आगामी काळात त्यांचे ११ विविध विषयांशी संबंधित ग्रंथ, काव्य संग्रह आणि प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणारे ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत, ज्यामुळे त्यांची ओळख एक प्रगतीशील लेखक म्हणून अधिक दृढ होईल. सध्या प्रा. गौतम केरबा गायकवाड हे अंबाजोगाई येथील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे पवित्र कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक लेखन, संशोधन, संपादन आणि आंबेडकरी चळवळ संदर्भात विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांच्या या अद्वितीय योगदानासाठी त्यांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन!

**प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे**

# ऑल इज वेल २७ जूनला चित्रपटगृहात

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:मैत्री ... ती तशी कोणाबरोबरही होते, अनेकदा आपल्याही नकळत. त्याला वय, भाषा, धर्म, वर्ण कशाचीही मर्यादा नसते. अशाच एका मैत्रीची अनोखी गोष्ट वाणीश्री फिल्म प्रॉडक्शन्सच्या ङ्गऑल इज वेलफ या मराठी चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. अमर, अकबर आणि अँथनी यांच्या मैत्रीची ही गोष्ट आहे. मनोरंजन आणि मस्तीचे जबरदस्त पॅकेज असलेल्या ङ्गऑल इज वेलफ चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश जाधव तर लेखन प्रियदर्शन जाधव यांचे आहे. बेळगावकर असलेल्या निर्माते अमोद मुचंडीकर,वाणी हालप्पनवर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी आहेत. येत्या २७ जूनला ङ्गऑल इज वेलफ चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. सहकुटुंब अनुभवायला मिळणारी हास्याची मेजवानी असून ङ्गऑल इज वेलफ हा चित्रपट मनोरंजनाची अफलातून ट्रीट असणार आहे असा विश्वास निर्माते अमोद मुचंडीकर यांनी व्यक्त केला. आनंद, राग, मनातील गुपितं व्यक्त करण्यासाठी हक्काची मैत्री असली की आयुष्य रंगतदार होतं हा आशय अधोरेखित करणाऱ्या ङ्गऑल इज वेलफ चित्रपटातून प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर हे जबरदस्त त्रिकुट पहिल्यांदाच एकत्र आले आहे. या तिघांसोबत चित्रपटात सयाजी शिंदे, अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर आदि कलाकारांच्या भूमिका आहेत.




मैत्रीसाठी काहीही करायला तयार असणाऱ्या या तीन मित्रांच्या आयुष्यात अशा घटना घडतात की, त्यांच्या आयुष्यात खळबळ उडते. मात्र न डगमगता हे तीनही मित्र परिस्थितीला सामोरे जात एकत्र उभे ठाकतात. आपल्यातील मैत्री जपत फसवणुकीचा हे तीन मित्र कसा निकाल लावतात? याची धमाल दिग्दर्शक योगेश जाधव यांनी ङ्गऑल इज वेलफ चित्रपटामधून दाखविली आहे. ऑल इज वेलफ चित्रपटाचे कार्यकारी निर्माते संजय ठुबे आहेत. संगीत चिनार-महेश, अर्जुन जन्या यांचे आहे. छायांकन मयुरेश जोशी तर संकलन अथश्री ठुबे यांचे आहे. नृत्यदिग्दर्शक राजेश बिडवे तर साहसदृश्ये अजय ठाकूर पठाणीया यांची आहेत. वेशभूषा कीर्ती जंगम तर रंगभूषा अतुल शिधये यांनी केली आहे. गीतकार मंदार चोळकर आहेत. गायक रोहित राऊत, गायिका अपेक्षा दांडेकर यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत. कलादिग्दर्शन नितीन बोरकर यांचे आहे.तरुणाईची कथा असलेला ङ्गऑल इज वेलफ हा चित्रपट कलाकारांचा सुरेख अभिनय, सुमधूर संगीत आणि नेत्रसुखद सादरीकरणाने सजला आहे.

# ई-चावडी प्रणाली अद्ययावतीकरण

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:महसूल प्रशासनाचे कामकाज अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात मई-चावडी प्रणालीफ लागू करण्यात आली आहे. ग्राम महसूल अधिकारी यांच्या दप्तरातील गाव नमुने १ ते २१ ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने ही प्रणाली अत्यंत महत्त्वाची आहे. या प्रणालीद्वारे प्रत्येक गावातील महसूल मागणी निश्चिती करणे आणि त्यानुसार महसुलाची वसुली या प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याची कार्यवाही सध्या प्रगतीपथावर आहे.नागरिकांकडून जमा होणाऱ्या रकमा दररोज बिनचूकपणे जमा करण्याची कार्यवाही करणे, ही ई-चावडी प्रणालीतील आकारणी विषयक अद्ययावतीकरण टप्प्याची अंतिम आणि महत्त्वपूर्ण पायरी आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जिल्हाधिकारी, विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी, हरिष धार्मिक यांचे मार्गदर्शनाखाली आज दिनांक २० जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथील जिल्हा नियोजन सभागृह येथे जिल्ह्यातील सर्व ग्राममहसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांच्यासाठी मई-चावडी प्रणाली अद्ययावत करण्या संदर्भात विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास निवासी उपजिल्हाधिकारी, शिवकुमार स्वामी, तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, नरेंद्र कुलकर्णी, आणि तहसीलदार, चंदकांत शेळके हे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणाचे मार्गदर्शन उमरगा तहसील कार्यालयातील मास्टर ट्रेनर सुशांत गिरी यांनी केले.

## पान सहा वरुन

### चोरी करुन चोरट

संशयित रित्या घारगाव वेगाने सुलतानपूर कडे जात असताना दिसली त्यांनी सदर वाहनाचा पाठलाग असताना त्या वाहनाचे टायर फुटले त्यामुळे वाहन हे रस्त्याच्या साईडचा दगडावर धडकले व वाहनातील आरोपींनी तेथून अंधाराचा फायदा घेत पड काढला. त्यातील एका पाठलाग करून आरोपीला ताब्यात घेतले. इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून एक पथक नेमण्यात आले. पोलिसांनी ताब्येत घेतलेल्या आरोपीची विचारपूस करून इतर आरोपींना निष्पन्न करून त्यांना २४ तासाच्या आत तब्येत घेऊन त्यांच्या ताब्यातून चोरी करण्यासाठी वापरलेली ईरटीका गाडी, कटर, टाम्बा, कटावण्या, तलवार, चाकू, हातोडी असा एकूण,७ लाख ६ हजार ४७० रूपांचा मुद्देमाल जप्त केला. सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली लोणार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निमिष मेहेत्रे, -झख गणेश इंगोले, झडख इंगळे, पोहेकॉ. संतोष चव्हाण, नितीन खराटे, गणेश लोढे, अनिल शिंदे, ज्ञानेश्वर निकस, गजानन डोईफोडे, हरिभाऊ ढाकणे यांनी केली आहे.

### कलेक्टर साहब

केवळ आदेश काढले नाहीत तर सुलभ शौचालयाच्या संदर्भात केलेल्या कामाचा अहवाल सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावा असेही आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील महिलांना भेडसावणरा हा प्रश्न सालेहा जिलानी शेख यांच्यामुळे मार्ग लागल्याचे दिसत आहे.

### ...पण स्वागताला भाजपाचे

गरज आहे, आणि ही सायकल वारी त्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे. वैद्यनाथ नगरीने नेहमीच समाजहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले असल्याचे ते म्हणाले.यानंतर सर्व युवकांनी प्रभू श्री वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. हर हर महादेव! वैद्यनाथ भगवान की जय! अशा जयघोषात ही पर्यावरण संदेश देणारी सायकल वारी पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

### प्रशासनाची पारदर्शकतेकड

कामकाजाचा आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांनी यामध्ये कोणतीही दिरंगाई न करता कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली.जिल्हा परिषद कन्या प्रशाला, पाटोदा येथे शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याबाबत पत्रकारांनी लक्ष वेधले. तसेच पाटोदा शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा (इयत्ता ८वी ते १०वी) पुन्हा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाला योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी श्रीमती वसिमा शेख, पाटोदा पोलीस स्टेशनचे पीआय जाधव साहेब, पोलीस आणि महसूल विभागातील अधिकारी, पत्रकार व शेतकरी वर्ग उपस्थित होता. शेतकऱ्यांच्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. या भेटीमुळे पाटोदा तालुक्यातील नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, प्रशासन जनतेच्या सेवेसाठी कसे कार्यरत आहे, याचे प्रत्यक्ष उदाहरण ठरले आहे.

### वृक्षसंवर्धन हीच काळाची

व्यक्तींमुळे ही झाडे टिकून राहतात आणि बहरतात. या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत सामाजिक कार्यकर्तेड. मनोजअप्पा संकाये यांनी नुकतेच केशवराव कुरुडे यांचा विशेष सत्कार केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, आज वृक्षलागवडीपेक्षा वृक्षसंवर्धन ही काळाची खरी गरज आहे. झाडे लावणे तुलनेने सोपे आहे, पण ती जगवण्यासाठी नित्यनेमाने काळजी घेणे हे फार मोलाचे कार्य आहे. केशवराव कुरुडे यांच्या कार्यातून समाजाला खरी दिशा मिळते. अशा व्यक्तींचा सन्मान होणे ही काळाची गरज असल्याचे सांगून यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले की, झाडे लावावीतच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ती झाडे जगवण्यासाठी पुढे यावे. पर्यावरणाची जबाबदारी ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला शिवसेनेचे नेते राजू तीळकरी व गौरीशंकर मोदी सर हेही उपस्थित होते. शिवसेना नेते राजू तीळकरी यांनी केशवराव कुरुडे यांच्या कार्याची स्तुती करताना सांगितले की, समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा प्रकारे पर्यावरणासाठी एक पाऊल पुढे टाकले, तर आपले शहर अधिक हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त होईल. आजच्या काळात अशा सेवाभावी वृत्तीच्या लोकांची नितांत गरज आहे. केवळ वृक्षारोपण नव्हे, तर झाडांचे जतन व संवर्धन यावर भर देणाऱ्या व्यक्तींना समाजात मानाचे स्थान मिळणे आवश्यक आहे. केशव कुरुडे हे कृषी विभागातून सेवानिवृत्त आहेत त्यांचे वय आज घडीला ८० वर्षे आहे. केशवराव कुरुडे यांचे हे कार्य फक्त झाडांसाठी नव्हे, तर समाजाला शुद्ध श्वास देणारे आहे असे सांगितले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## जोगेश्वरीत शालोपयोगी किटचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**मुंबई :** जोगेश्वरी (पू),भगत निवास येथे शैक्षणिक वस्तूंचे शालेय किट बनवणे कार्यक्रमाचा लोकार्पण सोहळ्यास आमदार बाळा नर, अलर्ट सिटीजन फोरमचे प्रमुख महेश जाधव, रुग्ण मित्र विनोद साडविलकर, गणेश पवार, किरण साळवे, रमेश चव्हाण यासोबतच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद काजरोळकर, विनोद नवले, संजय नायकवडी, शिखर क्लबचे आनंद पुष्याची इ. मान्यवर नुकताच पार पडला. मुंबईतील ७० ते ८० विविध संस्थाचे सामाजिक कार्यकर्ते अलर्ट सिटीझन फोरम संस्थेची टीम यांच्या माध्यमातून तब्बल सहा हजार मुलांसाठी शैक्षणिक साहित्य किट बनवण्यात आले. सदर किट हे दुर्गम मागास भागातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहेत. ज्यामध्ये पालघर जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड,तलासरी, डहाणू यासोबतच पुण्यातील मुरबाड, माळशेज आणि कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही भागांमध्ये येणाऱ्या महिन्याभरात विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल. सदर कार्यक्रमाचे हे सलग आठवे वर्ष असून यंदाही संपूर्ण लोक निधी लोकवर्गणी आणि व्यावसायिक सामाजिक दायित्वातून विद्यार्थी दत्तक योजना सामाजिक उपक्रम या अंतर्गत आहे. किट बांधणी उपक्रमांत स्थानिक शालेय विद्यार्थी, महिला-पुरुष पालक, देणगीदारांनी मोलाचे योगदान दिल्याबद्दल फोरमच्या वतीने निरंजन आहेर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# आता डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याच्या मोजमापासाठी महापलिकेचे वजनकाटे

◆ मुंबई (खास प्रतिनिधी):

**▮ देवनार, कांजूर येथे अत्याधुनिक पद्धतीचे वजन काटे ▮ कचऱ्यातील मापातील पाप शोधणार**



मुंबई महापालिकेच्या कचऱ्या विल्हेवाट लावण्यात येणाऱ्या कांजूर मार्ग आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडवर वाहनातून येणाऱ्या कचऱ्याचे वजन मोजण्यासाठी वजन काटे खासगी कंपनीकडून बसवण्यात आले असले तरी आता या दोन्ही ठिकाणी महापालिकेच्यावतीने वजनकाटे बसवण्यात येणार आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी येणाऱ्या कॉम्पॅक्टरमधील कचऱ्याचे वजन खासगी वजन काट्यावर केल्यानंतर महापालिकेच्या वजन काट्यावरही केले जाणार आहे. ज्यामुळे मुंबईतून उचण्यात येणाऱ्या कचऱ्यातील मापातील पाप शोधून नेमका किती कचरा डम्पिंग ग्राऊंडवर जातो याची अचूक माहिती समोर येणार आहे.

मुंबईतील विविध विभागांतून महानगरपालिकेद्वारे नेमणूक केलेल्या कंत्राटदारांच्या व महानगरपालिकेच्या कॉम्पॅक्टरद्वारे उचलून कांजूर मार्ग येथील डम्पिंग ग्राऊंड आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडवर येथे कचरा वाहून नेला जातो. कांजूर मार्ग डम्पिंग ग्राऊंडवर सुमारे ५९०० मेटीक टन आणि देवनार डंपिंग ग्राउंडवर सुमारे ६०० मेटीक टन एवढा कचरा टाकला जातो. सद्यस्थितीत कांजूरमार्ग घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प येथे खासगी कंत्राटदार असलेल्या ॲन्टोनी लारा एनव्हायरोमेंट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या वतीने वजन काटा बसवण्यात आला असून या वजनकाट्यांचा सहाय्याने कचऱ्याचे वजन केले जाते. तसेच देवनार डम्पिंग ग्राऊंडवरही वजन काटा बसवण्यात आला असून या दोन्ही डम्पिंग ग्राऊंडवरील वजन काट्याच्या माध्यमातून मुंबईतून कॉम्पॅक्टरद्वारे आणलेल्या कचऱ्याचे वजन केले जाते.

मात्र, कांजूर मार्ग आणि डम्पिंग ग्राऊंड येथे वजन काटे उपलब्ध असले तरीही महापालिकेच्यावतीने आता अत्याधुनिक पध्दतीचे वजन काटे बसवण्यात येणार आहे. यासाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या वजन काट्याची उभारणी करण्यासाठी पाटील इलेक्टिकल्सची नेमणूक करण्यात आली आहे. देवनार आणि कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडवर खासगी कंपनीच्यावतीने वजन काटा असला तरी भविष्यात महापालिकेच्यावतीने देण्यात येणाऱ्या नवीन कंत्राट कामांमध्ये कचऱ्याच्या कामाचे पैसे हे वजनावर आधारीत असल्याने त्यासाठी पुरक वजन काटे बसवण्याचा महापालिकेच्यावतीने निर्णय घेण्यात आला. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार दोन्ही डम्पिंग ग्राऊंडवर वजन काट्यावरच कॉम्पॅक्टरमधील कचऱ्याची नोंद यापूर्वी घेतली जात होती, ती नोंद पुढेही या वजन काट्यावर असेल. तसेच महापालिकेच्यावतीने स्वतःचे वजन काटे बसवले जाणार असून त्याठिकाणी महापालिकेचे कर्मचारी कार्यरत राहतील. त्यामुळे या वजन काट्याची उभारणी झाल्यानंतर खासगी वजन काट्यावरील कचऱ्याचे वजन केल्यानंतर महापालिकेच्या वजन काट्यावरही कचऱ्याचे मोजमाप केले जाणार आहे. त्यामुळे दोन्ही वजन काट्यावरील कचऱ्याचे वजनामुळे अचूक मापन केले जाणार असल्याने भविष्यातील कंत्राट कामांमध्ये या वजन काट्याच्या आधारे अचूक कचऱ्याचे मोजमाप केले जाईल,असे सांगितले.

# कुर्ला, पवई आणि विक्रोळीत सोमवारी पाणीकपात




◆ मुंबई (खास प्रतिनिधी):

पवई जलाशयाच्या संरचनात्मक दुरूस्तीचे काम मुंबई महानगरपालिकेने सुरू केले आहे. या अंतर्गत कप्पा क्रमांक २ चे संरचनात्मक दुरूस्ती काम पूर्ण झाले आहे. आता कप्पा क्रमांक १ च्या संरचनात्मक दुरूस्तीचे काम सुरू करण्यात येणार आहे. या संरचनात्मक दुरूस्ती केलेल्या पवई निम्नस्तर जलाशयाच्या कप्पा क्रमांक २ मधून सोमवारी २३ जून २०२५ पासून पाणीपुरवठा केला जाणार आहे.

त्या अनुषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून सोमवारी २३ जून २०२५ नंतर पुढील ३ ते ४ दिवस 'एल' विभागातील कुर्ला परिसर व 'एस' विभागातील पवई, विक्रोळी भागातील नागरिकांनी पाणी उकळून व गाळून प्यावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनातर्फे करण्यात येत आहे. या भागातील नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाणी उकळून - गाळून प्यावे आणि महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### या भागांत होणार पाणीकपातीचा परिणाम

'एल' विभाग :पाणीपुरवठा कुर्ला उत्तर परिक्षेत्र

बरेली मशीद, ९० फुटी मार्ग कुर्ला-अंधेरी मार्ग, जरीमरी, घाटकोपर-अंधेरी जोडरस्ता (लिंक रोड), सावरकर मार्ग, महात्मा फुले नगर, तानाजी नगर, साकी विहार मार्ग, मारवाह उद्योग मार्ग, सत्यनगर पाईपलाईन मार्ग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी ६.०० ते दुपारी २.०० वा.)

**'एल' विभाग : पाणीपुरवठा कुर्ला दक्षिण परिक्षेत्र**

काजूपाडा, गणेश मैदान, इंदिरानगर, संगम वसाहत, शास्त्रीनगर, घास कंपाऊंड, ख्रिश्चन गांव, मसरानी गल्ली, गाझी मिया दर्गा मार्ग, ए. एच. वाडिया मार्ग, वाडिया इस्टेट, एम. एन. मार्ग, बैलबाजार, संदेश नगर, क्रांती नगर, लाल बहादूर शास्त्री (एल. बी. एस.) मार्ग, कमानी, कल्पना सिनेमागृह, किस्मत नगर, गफूर खान इस्टेट, संभाजी चौक, न्यू मील मार्ग, रामदास चौक, ईगलवाडी, आण्णासागर मार्ग, ब्राह्मण वाडी, पटेल वाडी, स. गो. बर्वे मार्ग, बुद्ध कॉलनी, एल. आय. जी. – एम. आय. जी. कॉलनी, विनोबा भावे नगर, एच. डी. आय. एल. संपूर्ण संकुल, नौपाडा, प्रीमिअर वसाहत, सुंदरबाग, शिव टेकडी, संजय नगर, कपाडिया नगर, रुपा नगर, तकिया विभाग, मॅच फॅक्टरी गल्ली, शिवाजी कुटीर गल्ली, टॅक्सीमन वसाहत, इंदिरा नगर, महाराष्ट्र काटा, लाल बहादूर शास्त्री (एल. बी. एस.) मार्ग, चाफे गल्ली – चुनाभट्टी, सेवक नगर, विजय नगर, जरीमरी माता मंदीर परिसर (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सायंकाळी ६.३० ते सकाळी ८.५० वा.)

**'एस' विभाग पाणीपुरवठा कुर्ला दक्षिण परिक्षेत्र**

मोरारजी नगर, भीमनगर, पासपोली गावठाण, लोकविहार वसाहत, रेनेसेन्स हॉटेल परिसर (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सायंकाळी ६.३० ते सकाळी ८.५० वा.).

## वेचक

### कोकण कट्टाकडून बालग्राम बालकांना धान्य भेट

**मुंबई :** विलेपार्ले येथील सेवार्थ उपक्रम करणारी नामवंत संस्था कोकण कट्टा या संस्थेकडून बालग्राम पेण संस्थेच्या अनाथ,गरजू आदिवासी पाड्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी तांदूळ व डाळ १७५० किलो धान्य व पेन पेन्सिल भेट देण्यात आली. ग्रामसंवर्धन संस्थेचे संतोष ठाकूर, राजेश




रसाळ, राजू पाटील, मानसीताई यांच्याकडे सुपूर्द केले. कोकण कट्टाचा फणस जंगल या उपक्रम ही येथे मुलांकडून रोप वाटिकासाठीसाठी १०० हून अधिक बियारोपण करण्यात आल्या. संस्थापक अजित पितळे मार्गदर्शक दादा गावडे, सुजित कदम,अशोक भोईर आणि निशिकांत मोरे उपस्थित होते. पार्लेकर तसेच श्री स्वामी समर्थ मठ पारले, वीर हनुमान सोसायटी नंबर २, अचानक क्रीडा मंडळाचे ही योगदान भिक्षा फेरीला लाभले होते. संतोष ठाकूर यांनी देणगीदार नागरिकांचे आभार मानले. कोकण कट्टाच्या माध्यमातून साई आधार भाताणे येथे २००० किलो तर कुडाळ येथील जीवन आनंद संस्थेला १२५ किलो तर बोरिवली येथील टच संस्थेला ५०० किलो धान्य देण्यात आले आहे. सह्याद्री संस्था देवबांध यांना ५०० किलो धान्य देण्यात येईल. कोकण कट्टा संस्थापक अजितदादानीं यासेवेत सहभागी सर्व सदस्य आणि नागरिक यांचे मनापासुन आभार मानले व प्रतिवर्षी अशीच मदत करत करावी, असे आवाहन केले.

## मीडिया एक्सलन्स ॲवॉर्ड्स २०२५ पुरस्कार सोहळा उत्साहात

◆ कांदिवली (वार्ताहर) :

**अशोक सराफ, नीलम गोऱ्हे यांच्यासह दिग्गज मान्यवरांचा सन्मान**



माध्यमांच्या आजच्या जडणघडणीचा अविभाज्य घटक असलेल्या आणि या वर्षी विशेष प्रभावशाली ठरलेल्या कला, सामाजिक, राजकारण अशा विविध कार्यक्षेत्रात आपला जोरदार ठसा उमटवणाऱ्या मान्यवर दिग्गज व्यक्तींच्या कार्याचा गौरव 'मीडिया एक्सलन्स अवॉर्ड्स २०२५' देऊन करण्यात आला. नीलम गोऱ्हे,अशोक सराफ, सयाजी शिंदे आणि रविराज इवळे यांच्यासह मान्यवरांना 'माई मीडिया २४' प्रस्तुत मीडिया असोशिएशन ऑफ इंडियाच्या वतीने दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

विधान परिषद शतक महोत्सवानिमित्त केलेले कार्य व साहित्य निर्मितीच्या ऐतिहासिक कार्यासाठी साहित्य क्षेत्रातील योगदान म्हणून विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, तसेच पद्मश्री महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेते विजय पाटकर (माजी अध्यक्ष अ. भा. म. चि. महामंडळ) या मान्यवरांचा 'विशेष सत्कार' करण्यात आला. माध्यम प्रतिनिधींनी दिलेला पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे, असे अशोक सराफ यांनी सांगितले.

## लाईन स्टाफ' कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक विचार

**मुंबई :** महावितरण कंपनीतील लाईन स्टाफ कर्मचारी हे अत्यंत महत्त्वाचे काम करणारे घटक असून, त्यांच्याशी संबंधित प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका अधिक असतो. त्यामुळे त्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने, सेफ्टी शूज आदी साधने व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुरक्षित साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

# विचाराधीन बंद्यांना न्यायाचा मार्ग दाखवणारा विधी साहाय्य उपक्रम

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून सुरू असलेला उपक्रम**

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

कारागृहांमधील विचाराधीन बंद्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये सुरू केलेल्या देशातील पहिल्या विधी सहाय्य उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जवळपास २० हजार विचाराधीन बंद्यांना लाभ झाला आहे. त्यापैकी ९ हजार म्हणजेच ४५ टक्के बंदी विविध कायदेशीर प्रक्रियांद्वारे मुक्त करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे महत्व म्हणजे, केंद्र शासनाने देश पातळीवर हा उपक्रम स्वीकारला असून अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूदही केली आहे.

'प्रिझन स्टॅटिस्टिक्स इंडिया रिपोर्ट २०२१'नुसार, भारतातील कारागृहांमधील बंद्यांचा सरासरी दर १३० असून त्यामध्ये सुमारे ७७ टक्के बंदी हे विचाराधीन (अंडर ट्रायल) आहेत. या बंद्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत उद्योगपती अज़ीम प्रेमजी यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करीत देशातील पहिला विधी साहाय्य उपक्रम सुरू केला.

कायदेशीर प्रतिनिधित्वाच्या अभावामुळे किंवा जामीन घेण्याची आर्थिक क्षमता नसल्यामुळे अजूनही शिक्षा न ठरलेले बंदीजन आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे विचाराधीन बंदी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करीत आहेत.

विचाराधीन बंदीगृहातील बंद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने अज़ीम प्रेमजी फाउंडेशन आणि अंमलबजावणी भागीदार टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआय एसएस) आणि राष्ट्रीय विधी विद्यापीठ, दिल्ली यांच्या सहकार्याने सुरू केलेल्या विधी साहाय्य उपक्रमाने राज्यभरात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातील आर्थर रोड, भायखळा, कल्याण, तळोजा, लातूर, ठाणे, पुणे आणि नागपूर या आठ प्रमुख कारागृहात प्रभावीपणे राबविला जात आहे. या ठिकाणी सामाजिक कार्य व कायदा फेलोज यांची नेमणूक कारागृहांमध्ये तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांमध्ये करण्यात आली आहे. हे तज्ज्ञ बंद्यांना प्रकरणाच्या तयारीसाठी, न्यायालयीन प्रक्रियेत मार्गदर्शन करतात आणि प्रभावी विधी प्रतिनिधित्व मिळवून देतात.

या उपक्रमामुळे विधी साहाय्य व्यवस्थेत मूलभूत सुधारणा झाल्या असून सेवांमध्ये समन्वय वाढला आहे. दुर्बल व संवेदनशील बंद्यांसाठी न्यायाची उपलब्धता सुधारली आहे आणि धोरणात्मक स्तरावरही महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. या यशस्वी उपक्रमामुळे राज्य शासनाने अज़ीम प्रेमजी फाउंडेशनसोबतच्या सामंजस्य कराराचे नूतनीकरण केले आहे. या उपक्रमाचा दीर्घकालीन पद्धतीने राबवीत विस्तार करण्यात येत आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

## ई-ऑफिस प्रणालीमुळे महापारेषणच्या कामकाजाला गती : अविनाश निंबाळकर



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शी आणि 'पेपरलेस' होण्यासाठी 'ई-ऑफिस' प्रणाली सुरु करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात मुख्य कार्यालय आणि वाशी परिमंडलात हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, टप्प्याटप्प्याने सर्व परिमंडलात याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे महापारेषणचे संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर यांनी सांगितले.

महापारेषणच्या वतीने भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना निंबाळकर बोलत होते. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य अभियंता सुनील सूर्यवंशी, महेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे उपस्थित होते.

निंबाळकर म्हणाले, `राज्यातील महापारेषणच्या सर्व परिमंडल कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणालीचा प्रभावी वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहित होणार असल्याने अधिक सुलभता येईल. यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे फाईलचा `स्टेटस तत्काळ समजणार आहे. सुचिता भिकाने म्हणाल्या, ई-ऑफिस' प्रणालीमुळे दैनंदिन कामकाजासोबतच सर्व विभागांतील कामाला गती मिळाली आहे. तसेच सर्व कामकाज कागदाविना (पेपरलेस) होऊन ते सुसह्य झाले आहे. या प्रणालीमुळे कालमर्यादेत म्हणजे ७२ तासांत नस्ती निकाली काढण्याचे बंधनही अधिकाऱ्यांवर असणार आहे. कर्मचाऱ्यांनीही सकारात्मक पध्दतीने पूर्ण क्षमतेने काम करावे. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक सुगत गमरे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# दुर्मीळ हिमोफिलियाग्रस्त महिलेने कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये दिला सुरक्षितपणे बाळाला जन्म

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी):




दुर्मीळ हिमोफिलियाग्रस्त महिलेने कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये सुरक्षितपणे बाळाला जन्म दिला. गुजरातमधील एका छोट्या शहरात राहणाऱ्या २८ वर्षीय नाझनी खानसाठी मातृत्व हे एक अशक्य स्वप्न बनले होते. दोन गर्भपातानंतर, नाझनी आणि तिचा पती - जे एक रोजंदारी कामगार आहेत. यांना पुन्हा गर्भवती होण्याची फारशी आशा उरली नव्हती, अशात त्यांना पुन्हा दिवस गेले. पण त्यांच्या या आनंदावर एका भयानक वास्तवाची काळी सावली पडली: नाझनी यांना टाइप ३ हिमोफिलिया असल्याचे निदान झाले. हा जगातील सर्वात दुर्मिळ रक्तस्त्राव विकारांपैकी एक आहे, जो १० लाख महिलांपैकी १ पेक्षा कमी महिलांना होतो.

सातव्या महिन्यात, नाझनीला सतत रक्तस्त्राव होऊ लागला, ज्यामुळे केवळ तिच्या गर्भधारणेलाच नव्हे तर तिच्या जीवालाही धोका निर्माण झाला. उपचारांसाठी मल्टी-डिसिप्लिनरी, संसाधन-केंद्रित दृष्टिकोन आवश्यक होता. कमी उत्पन्न असलेल्या समुदायांमध्ये असे उपचार बहुतेकदा उपलब्ध नसतात. परंतु पुन्हा एकदा आशा निर्माण झाली कारण एका समर्पित वैद्यकीय पथकाने हार मानण्यास नकार दिला.नवी मुंबईतील कोकिलाबेन हॉस्पिटलमधील सेल्युलर थेरपी हेमॅटो-ऑन्कोलॉजिस्ट डॉ. कुणाल गोयल यांनी या प्रकरणाची जबाबदारी घेतली होती.

## साठ्ये कॉलेजमध्ये २१ वर्षीय तरुणीची आत्महत्या

**मुंबई :** विलेपार्ले येथील साठ्ये कॉलेजमध्ये धक्कादायक घटना घडली. कॉलेजमध्ये शिकणारी २१ वर्षीय तरुणीने कॉलेजच्या इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केल्याचे सांगण्यात येते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २१ वर्षीय मुलीचा मृतदेह आढळल्यानंतर साठे कॉलेजमध्ये खळबळ उडाली आहे. मृत मुलगी त्याच कॉलेजमध्ये थर्ड ईयरची विद्यार्थिनी होती.

कॉलेज प्रशासनाने तिच्या कुटुंबीयांना सांगितले की, तिचा मृत्यू तिसऱ्या मजल्यावरुन पडल्याने झाला. संध्या पाठक असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. मुलीनी टोकाचा पाऊल का उचलला यासंदर्भात विलेपार्ले पोलिसांनी एडीआर दाखल करून पुढील तपास करत आहेत तर शाळेत असलेल्या सीएसटीव्हीचा तपास करत आहेत.

## सोमैया विद्याविहार संकुलात 'घननिळा बरसणार'

**मुंबई :** मराठीसोबतच अन्य भारतीय भाषांतील गीतांना संगीत देणारे सुप्रसिद्ध संगीतकार पद्मभूषण श्रीनिवास खळे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून अजरामर गीतांनी रसिकांचे मन मोहून टाकणाऱ्या या महान संगीतकाराने स्वरसाज चढविलेल्या गीतांचा घननिळा बरसला हा विशेष कार्यक्रम सोमया विद्याविहार विद्यापीठाच्या 'फॅकल्टी ऑफ लँग्वेजेस अँड लिटरेचर' आणि एस. के.सोमैया ज्यु. कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे सोमैया विद्याविहार संकुलातील डी.एड. कॉलेज हॉल मध्ये शनिवार २१ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. मराठीतील प्रतिथयश संगीतकार आणि गायक भगवंत नार्वेकर आणि गायिका सायली महाडिक हा कार्यक्रम सादर करणार आहेत.

या चिमण्यानो परत फिरा, सुंदर ते ध्यान, कळीदार कपुरी पान, गेले ते दिन गेले, बगळ्यांची माळ, जेव्हा तुझ्या बटां ना अशी अप्रतिम नादमधुर गीते या कार्यक्रमात सादर होणार असून,हा कार्यक्रम विनामुल्य असल्याने रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे सोमैया विद्याविहार विद्यापीठ, भाषा आणि साहित्य फॅकल्टीच्या डीन( अधिष्ठाता ) डॉ. वीणा सानेकर यांनी कळविले आहे.

## बेस्ट कामगारांचे प्रशन मार्गी लावा

**कामगार मंत्री फुंडकर यांचे प्रशासनाला आदेश**



◆ कांदिवली (वार्ताहर) :

बेस्ट कामगारांचे प्रश्न मार्गी लावा, असे आदेश कामगार मंत्री फुंडकर यांचे संयुक्त बैठकीत बेस्ट प्रशासनाला दिले.

भाजपा बेस्ट कामगार संघाचे सरचिटणीस व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष कामगार मोर्चा गजानन नागे यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार बुधवारी मंत्रालयात संयुक्त बैठक संपन्न झाली. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी बैठकीत बेस्ट प्रशासनाचे सह महाव्यवस्थापक आनंद साखरे यांना कामगारांचे भत्ते,निवृत्त कामगारांची देणी, कोविड भत्ते आणि इतर मागण्या तातडीने मार्गी लावण्याचे आदेश दिले. यामुळे बेस्ट कामगारांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी व बेस्ट कामगारांच्या सुरक्षित भविष्यासाठीसंबंधित पालिका व बेस्ट अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक, घेतली. यां बैठकीत कामगार सचिव कुंदन, महानगरपालिकेचे सहआयुक्त, कामगार सहायक आयुक्त अतुल सावरकर, बेस्ट प्रशासनाचे सह महाव्यवस्थापक आनंद साखरे व इतर बेस्ट अधिकारी तसेच व्हिजिलन्स, अकाऊंट, वाहतूक आणि ऑडिटर विभागीय सर्व अधिकारी उपस्थित होते. सर्वांच्या समक्ष चर्चेमध्ये २०१६-२०२१ च्या करारातील एरिअर्स व भत्ते अदा करणे,रिटायर झालेले कामगारांच्या देणी, रखडलेले कोविड भत्ते आदी विषयांवर चर्चा झाली.

फुंडकर यांनी टप्प्या, टप्प्यात कोविड भत्ता देण्याचे आदेश दिले तसेच सिनियरिटीने ड्रायव्हर कंडक्टर यांच्या प्रमोशन करण्याबाबत निर्णय झाला, रखडलेला एलटीए, विविध विभागात भरती बाबत निर्णय घेतला, २०२१-२०२६चा करार लवकर करण्यात यावा. बेस्ट उपक्रमातील ३३३७ बस ताफा पूर्ण करण्यात यावा. बेस्ट अधिकाऱ्यांची दादागिरी खपवून घेणार नाही असा इशारा देण्यात आला.

### बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे सादरीकरण

# 'मराठी उद्योजक अभिमान गीता'चे उद्योग मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

◆ मुंबई (प्रतिनिधी):




मराठी उद्योजकतेच्या प्रेरणास्थानी ठरणारे गाणे, अर्थसंकेतचे संस्थापक 'अमित बागवे' यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'मराठी उद्योजक अभिमान गीत' याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते लोकार्पण झाले. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, रचना बागवे व मंदार नार्वेकर उपस्थित होते. मराठी उद्योजकांसाठी बनवलेले हे गीत ऐतिहासिक 'बॉम्बे स्टॉक एक्सचेंज' येथे सादर करून अमित बागवे यांनी एक आगळावेगळा विक्रम केला आहे. मी उद्योजक होणारच संस्थेतर्फे आयोजित 'ग्लोबल मराठी उद्योजकीय परिषद' यावेळी पार पडली. परिषदेला एक हजारहून अधिक उद्योजकांची उपस्थिती लाभली.

हृदयस्पर्शी शब्द, जिद्दीचा सूर आणि महाराष्ट्राच्या मातीतली ऊर्जा – या सगळ्यांचे एकत्रित दर्शन म्हणजे हे "मराठी उद्योजक अभिमान गीत". हे गाणे उद्योजकांच्या प्रत्येक संघर्षात, स्वप्नात आणि यशात प्रेरणा देणारे आहे. मराठी माणूस केवळ कलेत, साहित्यात, विचारांतच नव्हे तर उद्योग-व्यवसायातही अग्रेसर आहे, हा संदेश या गाण्यातून देण्यात आला आहे. हे गाणे मराठी उद्योजकतेचे पहिलेवहिले 'थीम सॉंग' ठरले आहे. गाण्याच्या प्रत्येक ओळीतून मराठी माणसाचा उद्योजकीय आत्मा, ध्येयधुरंधर वृत्ती आणि महाराष्ट्राच्या मातीची ऊर्जा प्रकट होते. सदर गाणे 'डॉ, अमित बागवे' या युट्युब चॅनेलवर उपलब्ध आहे.

वर्ष २०१६ मध्ये अमित बागवे यांनी पहिल्यांदा अर्थसंकेतच्या माध्यमातून बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे मराठी उद्योजकांचा कार्यक्रम केला होता. त्यानंतर जवळपास १० वर्षांनी अमित बागवे यांच्या उद्योजकीय गाण्याचे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे सादरीकरण होणे हा एक सुदंर योग आहे.

हे गाणे जसे प्रेरणा आणि संदेश देणारे आहे, तसेच गाण्याच्या माध्यमातून अमित बागवे यांनी मराठी उद्योग जगताला बदललेल्या परिस्थितीची जाणीव करून दिली आहे. या गीताचे बोल, संगीत व गायन 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' अर्थात संगणकाची कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केले आहे. गाण्याची संकल्पना व संकलन अमित बागवे यांचे आहे. कौश्यल्य आधारित कामे सुद्धा 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' आजकाल सहजरित्या करीत आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# दहशतवादाच्या अंधारात सौरदिवे लावणारे



## उदय जगताप



काळोखाच्या गावी, प्रकाशाच्या वाटा

श्रद्धा बेलसरे खारकर

पुण्यात २००७/८ सालात गुन्हेगारांचे उदात्तीकरण होत होते. शहरात त्यांचे मोठमोठे फ्लेक्स लागत. अनेक चांगल्या घरातील मुले गुन्हेगारीकडे आकर्षित होत होती. या घटना सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप यांना विचलित करत होत्या. मग त्यांनी सरळ अनेक गुन्हेगारांशी चर्चा केली. माणसे गुन्हेगारीकडे का वळतात याचा अभ्यास केला, अनेकांचे समुपदेशन केले. दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये आदर्श मित्रमंडळाच्या वतीने पोलिसांच्या मुलांसाठीही अनेक उपक्रम राबवले. त्याला उत्तम प्रतिसादही मिळाला.

या दरम्यान गडचिरोली येथील नक्षलवाद्यांनी निरपराध लोकांच्या हत्या केल्याच्या बातम्या जगतापांच्या वाचनात आल्या आणि आपण तिथे जाऊन काही करावे असे त्यांना वाटू लागले. त्यांनी गडचिरोलीतील सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधला तेव्हा ते म्हणाले, 'या विषयात आम्हीच काम करत नाही. तर तू १००० किलोमीटरवरून येऊन कसे काही करू शकशील?' परंतु तिथेच जाऊन काम करायचे असा जगतापांचा निश्चय झाला होता. नक्षलवाद्यांनी ज्यांची हत्या केली आहे त्यांच्या मुलांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. ही मुले शाळेसाठी ५ / ५ किलोमीटर चालत जात असत. अशा ११० मुलांना सायकली घेऊन देण्यात आल्या. त्यावेळेचे पोलीस अधीक्षक संदीप पाटील, राहुल खाडे, सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास सुंचूवार यांनी खूप मदत केली. मुलांसाठी केलेल्या कार्यक्रमाला तेव्हाचे गृहमंत्री हंसराज अहीरही उपस्थित होते.

जे नक्षलवादी शरण येतात त्यांना आणि जे शहीद होतात त्यांना सरकारी मदत मिळते पण जे पोलिसांच्या चकमकीत मारले जातात अशांच्या कुटुंबीयांना मदत मिळत नाही. सरकार मदत करत नाही आणि नक्षलवादी त्यांच्याकडे ढुंकून बघत नाहीत. या लोकांची अवस्था फार दयनीय असते. हे लक्षात घेऊन अशा ४६ घरांना सर्वतोपरी मदत करण्यात आली.

अहेरी येथे 'रोटरी क्लब पुणे वेस्टएंड'च्या मदतीने अंगणवाडी सुरू करण्यात आली. मुलांना ई-लर्निंगद्वारे शिकवण्यात आले. हेमलकसा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ४० शिक्षकांची बैठक घेण्यात आली. काही शाळांना ई-लर्निंगचे कीट देण्यात आले, खेळातून, ग्राफिक्समधून मुलांना शिक्षण दिले गेले. पुस्तक दहीहंडीचा कल्पक कार्यक्रम राबवून १३,००० पुस्तके वाटली.

गडचिरोलीत असणारी पोलीस ठाणी ही कडेकोट किल्यासारखी बांधलेली असतात. तिथे फारसे कुणी येत-जात नाही. कधीकधी इथले पोलीस कर्मचारी नैराश्यात जातात. इथे वर्दळ नसते. जगतापांच्या संस्थेने मग पोलीस ठाण्यात ग्रंथालये सुरू केली. लहान मुले पुस्तके वाचण्यासाठी येऊ लागली. मुलांबरोबर आपोआपच पोलीसही वाचू लागले! पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख, सागर कवडे यांनी 'खाट लायब्ररी' ही संकल्पना पुढे आणली. म्हणजे एका गावात गाडीतून पुस्तके नेऊन एका खाटेवर ती मांडून ठेवायची, लोक येऊन पुस्तके वाचतात. याला चांगला प्रतिसाद मिळाला. मुलांना प्रथमच आपल्या गावात इतकी पुस्तके बघायला मिळाली. इथले रस्ते छोटे आहेत. तिथून चारचाकी गाड्या जाऊ शकत नाहीत. आजारी माणसाला दवाखान्यात नेणे अवघड जाते. त्यासाठी या कल्पक लोकांनी टू-व्हीलर अम्बुलंस सुरू केली!

आजही अनेक गावात दिवे नाहीत. आजूबाजूला घनदाट जंगल असल्यामुळे विजेच्या तारा नेता येत नाहीत आणि एखादा प्रयत्न केल्यास नक्षलवादी तो हाणून पाडतात! यावरही जगतापांनी कल्पक इलाज काढला. सौरऊर्जेवर चालणारे दिवे ७२ गावात बसवले. त्याला सेन्सर लावल्यामुळे माणूस जवळ आल्यावर आपोआप दिवा लागतो. पुण्यातील अनेक लोकांनी आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ हे सोलर दिवे तिथे लावले आहेत. हे काम मोठे कठीण होते. घनदाट जंगलामुळे साहित्य नेण्यास अडचण यायची. काही ठिकाणी छोट्या ओहळातून सामान वाहून नेण्यात आले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इथे प्रथमच अशी वीज आली!

आज शाळा, आश्रमशाळा अशा २७३ ठिकाणी मुलांना समुपदेशन दिले जाते. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या जातात. अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. आदिवासींमध्ये ऋतुमती स्त्रीयांसाठी एक भयंकर प्रथा आहे. मासिक पाळीच्या काळात स्त्रियांना जंगलात एखाद्या घाणेरड्या झोपडीत राहावे लागते. तिथे पाणी नसल्यामुळे स्वच्छताही करता येत नाही. लाईट नाही, सुरक्षा नाही त्यामुळे अनेक स्त्रिया साप चावूनही मरतात. गावकऱ्यांचे समुपदेशन करून स्त्रियांसाठी गावात स्वच्छ 'कुर्माघर' बांधण्यात आले. असे कितीतरी उपक्रम केले आहेत यासाठी रोमित तांबोलवार, संतोष मंथनवार, डॉक्टर सलुजा आणि पुण्यातील गणेश मंडळांनी विशेष योगदान दिले आहे.

नक्षलवादी भागात नेहमी रक्तरंजित घटनांच्या बातम्या वाचायला मिळतात. लोक सतत दहशतीखाली वावरतात. इथे शांतता नांदणे आवश्यक आहे असे वाटून विविध धर्मातील धर्मगुरूंना एकत्र बोलावून शांततेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी ६८७६ लोक उपस्थित होते. त्या भागातली लोकसंख्या ही विखुरलेली आहे. त्यामुळे इतकी कमी वाटणारी संख्यासुद्धा विक्रमी ठरते. यांची नोंद एक विक्रम म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये करण्यात आली. यापूर्वी टर्कीमध्ये ५००० हजार लोक एकत्र जमले होते.

आता अनेक नक्षलवादी सामान्य जीवन जगू लागले आहेत. ज्यांच्या हातात ए. के. ४७ बंदुका होत्या ते लोक 'गांधी विचार'च्या परीक्षा देऊ लागले. आजपर्यंत ५६ जणांनी ही परीक्षा दिली आहे. कुठलेही काम करत असताना स्थानिक अधिकारी आणि गावकऱ्यांची मदत मिळाल्याशिवाय ते पुढे जाऊ शकत नसते. संदीप पाटील, अभिनव देशमुख या पोलीस अधिकाऱ्यांनी जगतापांना फार मदत केली. शहिदांचे कुटुंबीय, पत्रकार व्यंकटेश दुडूमवार, खारकेले गुरुजी यांचा उल्लेख करावाच लागेल. पुण्यातील आदर्श मित्र मंडळ आणि रोटरी क्लब, पुणे वेस्टएंड यांच्या मदतीनेच हे काम होऊ शकले असा गौरवपूर्ण उल्लेख उदय जगताप करतात. या सगळ्या कामाचे फलित म्हणून गेल्या अनेक वर्षांत जिथे कधीही झेंडावंदन झाले नव्हते तिथे ते सलग ३ वर्षांपासून मोठ्या गौरवाने होत आहे. आता जगतापांतर्फे पुण्यात युवकांना 'न्यू स्टार्ट-अप'द्वारे मदत दिली जाते. तसेच कृतिम बुद्धिमत्ता वापरासाठी प्रशिक्षणही दिले जाते. पुणे शहर एकेकाळी विद्येचे माहेरघर मानले जायचे. आज परिस्थिती वेगळी आहे.राजकारणाचा स्तर घसरला आहे. यातून काय मार्ग काढता येईल अशा अनेक विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात येतात. त्याला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. पुण्यासारख्या शहरात राहून व्यवसाय सांभाळत उदय जगताप, त्यांचे सहकारी आदर्श मित्रमंडळाच्या मार्फत हे आगळे काम शांतपणे करीत आहेत. आपल्या कामाची प्रसिद्धी व्हावी असेही त्यांना वाटत नाही! केवळ आदिवासी आपले भाऊ आहेत त्यांनाही आपल्यासारखाच जगण्याचा अधिकार आहे, असे मानून जगतापांचे काम निरलसपणे सुरू आहे.

---



# साहसी गणेश



स्नेहधारा

पूनम राणे

मे महिन्याची सुट्टी लागली होती. गणेश आपल्या गावी आजी-आजोबांकडे गेला होता. शहरातल्या वातावरणापेक्षा गावातील वातावरण त्याला खूप आवडलं होतं. आजूबाजूचा मोकळा परिसर, शुद्ध हवा आणि महत्त्वाचं म्हणजे अनेक महिने रिकामे असलेले गाव माणसांनी गजबजून गेले होते.

गावातील प्रत्येक घराचे दार उघडले होते.

प्रत्येक घरातील कोणी ना कोणी शहरातून गावाकडे आलेला होता. रात्री ११ - १२ वाजेपर्यंत सर्वांच्या अंगणात बसून गप्पा चालत होत्या.

एकमेकांच्या घरी प्रत्येकजण जात होते. मे महिन्याची सुट्टी आनंदात चालली होती.

एके दिवशी सकाळी राधा मावशीच्या अंगणात जोरजोरात कोंबड्यांचा आवाज गणेशने ऐकला. सकाळचे ८ वाजले होते. राधा मावशी उठलेल्या दिसत नव्हत्या. गणेशच्या बाजूच्या घरी त्या राहत होत्या. कोंबड्यांच्या आवाजाने गणेश ताबडतोब राधा मावशीच्या घरी गेला. कोंबड्यांवर घातलेली डालगी त्यांने बाजूला केली. आतून दरवाजा बंद होता. त्याने मावशी... मावशी... म्हणून राधाबाईंना आवाज दिला; परंतु आतून काही आवाज येत नव्हता. गणेश घाबरला, वेगवेगळे विचार त्याच्या मनात येऊ लागले. रात्री आपण राधा मावशीसोबत बोलत होतो. अजून राधा मावशी का उठल्या नसाव्यात? लगबगीने त्याने गावातील राजू, शाम, गौरव या मित्रांना जमा केले आणि राधा मावशीच्या घरी घेऊन आला. गणेशने शिडी शोधून आणली. घराला शिडी लावली आणि शिडीवर चढून कौले काढून खाली वाकून पाहतो तर काय! राधामावशी चुलीच्या बाजूला निस्तेज पहुंडलेली होती. काहीच हालचाल दिसत नव्हती. गणेशने वरून खाली उडी मारली. मावशी... मावशी... म्हणून जोरजोरात हाका मारू लागला; परंतु मावशी काहीच बोलत नव्हती. गणेश खूप घाबरला आणि श्यामला म्हणाला, गावातील गुरवकाकांना घेऊन ये.

श्याम पळतच जाऊन गुरव काकांना घेऊन आला. राधा मावशीला पाहताच, गुरव काका म्हणाले, राधाबाई बेशुद्ध पडलेल्या. ॲम्बुलन्स बोलवा. राधाबाईंना डॉक्टरकडे घेऊन जायला पाहिजे. गणेशने ॲम्बुलन्सची व्यवस्था केली. गावातील सारी मंडळी झपाट्याने राधा मावशीच्या घरी जमा झाली. राधा मावशीला दोन मुले होती; परंतु ते दोघेही बाहेरगावीच राहत होते. राधामावशीला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यात आले. डॉक्टरने तपासले. म्हणाले, अजून थोडा वेळ गेला असता तर राधाबाईंना आपण कायमचे मुकलो असतो. औषधं गोळ्या आणि सलाईन लावताच राधा मावशी शुद्धीवर आल्या, त्यांनी डोळे उघडले. आपण आज एक चांगले काम केले याचा आनंद गावकरी मंडळींना झाला. गणेश व त्याच्या मित्रांना त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल गावकऱ्यांनी शाबासकी दिली. गावातील प्रत्येक जण रोज आळीपाळीने राधाबाईंची काळजी घेऊ लागला. राधा मावशीने गणेश आणि गणेशच्या मित्रांना भरभरून आशीर्वाद दिले. गणेशच्या साहसीपणामुळे राधा मावशींना जीवनदान मिळाले.

# सायबर गुन्ह्यात कंपनीचे नुकसान



क्राइम

ॲड. रिया करंजकर

आधुनिकीकरण हे झपाट्याने होत चाललेले आहे. याचे जेवढे फायदे आहेत तेवढ्याच पटीने त्याचे तोटेही आहेत. पूर्वी माणसांना पैसे काढण्यासाठी बँकेत जावं लागायचं. स्लीप भरावी लागायची. मग पैसे मिळायचे. मोबाईल आल्यानंतर ऑनलाइन गोष्टीमुळे बसल्या जागेवर आपण लगेच पैशांची देवाण-घेवाण करू शकतो. पूर्वी पोस्टाच्या पत्रामुळे आपल्याला एकमेकांची खुशाली कळत होती, पण त्यानंतर टेलिफोन, मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉपसारख्या अत्याधुनिक गोष्टीमुळे आपल्याला बसल्या जागेवर जगातल्या सगळ्या गोष्टी समजू लागल्या. माणसांना त्यामुळे फायदा होऊ लागला. त्यामुळे जगाची आर्थिक परिस्थिती बदलत चालली पण तेवढेच तोटेही लोकांना सहन करावे लागले. मोबाईल पेमेंट, इंटरनेट पेमेंट किंवा गुगल पे यांसारख्या पैशांच्या देवाण-घेवाण होणाऱ्या गोष्टीमुळे लोकांचा वेळ आणि श्रमाची बचत झाली असली तरी धोके मात्र वाढले. यात अनेक लोकांची आर्थिक फसवणूक झाली.

प्रत्येक देशामध्ये वेगवेगळ्या देशांचे छोट्या-मोठ्या कंपन्या या कार्यरत असतात किंवा त्या देशांमध्ये त्यांचे प्रतिनिधी हे काम बघत असतात. जपानची प्रसिद्ध कंपनी ही वेगवेगळ्या देशांमध्ये आपल्या प्रतिनिधींमार्फत आपल्या प्रोडक्टचं काम बघत असे. जपानची कंपनी म्हटल्यावर त्याचा मालही त्याच पद्धतीचा असायचा. त्याच्यामुळे या कंपनीच्या मालाला खरेदीदार जास्त होते. ही कंपनी त्यामुळे प्रॉफिटमध्ये होती. नावारूपाला आलेली कंपनी. त्याच्यामध्ये जपानमधील एक व्यक्ती प्रत्येक देशात आपल्या देशाचं प्रतिनिधित्व करून काम करत असे आणि त्या देशातले आर्थिक व्यवहारी तीच व्यक्ती बघत असे. संगस्वी हा जपानी माणूस भारतातील जपानच्या कंपनीचा व्यवहार बघत होता. त्याच्याकडे आर्थिक व्यवहारही होते. या कंपनीशी भारतातील अनेक ग्राहक जोडले होते आणि त्यांच्याशी या कंपनीची देवाण-घेवाण चालत होते. माल पाठवला जाईल त्यावेळी मेलवरून सर्व माहिती दिली जात असे. एवढंच नाहीतर आर्थिक माहितीचे मेल केले जात होते. संगस्वी मेलवरून सगळ्या गोष्टींवर लक्ष ठेवून होता.

एक दिवस लॅपटॉपमध्ये कंपनीचे मेल बघत असताना एका सर्वात जुन्या ग्राहकाचा मेल आला होता. त्या मेलमध्ये असं लिहिलेलं होतं की, तुमचा माल पोहोचलेला आहे आणि एवढी रक्कम कंपनीकडून येणे बाकी आहे. संगस्वी याने तो मेल बघितला. त्याची रक्कम पाठवायला पाहिजे म्हणून त्याने लगेचच त्या मेलची डिटेल घेऊन ७५ लाख पाठवूनही दिले. थोड्यावेळाने संगस्वीच्या लक्षात आले की, जे माल पाठवतात ते मेलसोबत फोनदेखील करतात. पण याने तसं काहीच केले नाही. म्हणून संगस्वीने लगेचच त्या ग्राहकाला फोन केला असता त्या ग्राहकाने मी मेल केलेला नाही आणि मालाबद्दल आपलं काहीच बोलणं झालं नाही असं सांगितलं. त्यावेळी संगस्वीला वाटले की, आपण सायबर क्राईममध्ये अडकलो आहोत. त्यांनी लगेच पोलिसांना फोन केला आणि त्याच्यासोबत घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. ज्या मेलने तो मेसेज आला तो चेक केल्यावर असं समजलं की त्या ग्राहकांना मेल केलेलाच नव्हता हे पोलिसांच्या लक्षात आल्यावर सायबर क्राईम यांनी ते ७५ लाख ज्या अकाऊंटवर पाठवले होते ते अकाऊंट बँकेला सांगून फ्रीज करण्यात आले. सगस्वी याच्या लवकर लक्षात आल्यामुळे या गोष्टी पटकन घडून ते अकाऊंट बंद करण्यात आले होते.

या सर्व गोष्टी त्याच्या हुशारीमुळे घडल्या पण आता ती रक्कम परत घेण्यासाठी त्याला कोर्टात जावं लागलं. कारण रिटर्न ऑफ प्रॉपर्टी ही कोर्टामधूनच होते आणि आता तो कोर्टाच्या फेऱ्या घालत आहे. हे त्याच्या हुशारीमुळे जरी घडलं असलं तरी कंपनीचं कितीतरी मोठं नुकसान झालेलं होतं. ते भरून काढण्यासाठी थोडा वेळ जाणारच होता. पण क्राईम सायबर गुन्हेगार हे लोकांना कशाप्रकारे फसवतात त्याचे अनेक प्रकार हे आधुनिकीकरणामुळे होत आहेत. कारण काही लोकांना, वयस्कर, अशिक्षित असलेल्या माणसांना अँड्रॉइड मोबाईल वापरण्याची सवय नसल्यामुळे किंवा काही गोष्टींचं सखोल ज्ञान नसल्यामुळे ते या सायबर गुन्ह्यात फसले जातात.

---



# साप्ताहिक भविष्य



मंगेश मधुसूदन महाडिक

१५ ते २१ जून २०२५

### जोडीदाराच्या मतास प्राधान्य द्या

**मेष**

आपणास काही निर्णय घ्यायचे असल्यास जोडीदाराचे मत आजमावून पाहा. व्यापार-व्यवसायातील काम पूर्ण होण्यासाठी नोकरदारांची आपणास साथ मिळणार आहे. घरातील बारीक सारीक वादांकडे आपणास स्वतःला लक्ष द्यावे लागणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना आपणास पूर्ण दक्ष राहावे लागणार आहे. कागदपत्रे नीट आहेत की नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रगती होणार आहे. आपल्याला मनासारखा प्रोजेक्ट मिळू शकतो.

### नवीन संधी मिळतील

**वृषभ**

ज्या व्यक्ती नोकरी करतात त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये चांगले बदल होतील. आपल्याला चांगल्या कंपनीमध्ये नोकरीची संधी मिळू शकते. आपण सावध राहणे बरे. नोकरीमध्ये बढतीचे योग आहेत. वरिष्ठ आपल्या कामावर खूश असणार आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आप्तेष्ट, नातेवाईक मंडळींशी नातेसंबंध मधुर ठेवण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना दक्ष राहणे आवश्यक आहे. नियम व अटींचे पालन करा. कोर्ट कामांना गती मिळण्याची शक्यता.

### प्रवास होतील

**मिथुन**

प्रवासामध्ये आपणास लाभ होणार आहेत. सामाजिक दृष्टिकोनातून यश, मान-सन्मान आणि प्रतिष्ठा वाढवणारा आहे. उच्चस्तरीय लोकांच्या संपर्कात येणार आहात. अविवाहित व्यक्ती विवाहाच्या बंधनात अडकणार आहेत. आपल्या पारंपरिक स्थावर मालमत्तेविषयी काही वादविवाद निर्माण होण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या मध्यावधीमध्ये अचानक बदल लाभाची शक्यता आहे. त्यामुळे आपण प्रफुल्लित राहाल. कर्माबरोबर आपल्या भाग्याची साथ लाभणार आहे. धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होईल.

### वाद-विवाद टाळा

**कर्क**

ज्या व्यक्ती स्थावर मालमत्तेविषयी काम करतात, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अचानक नवीन नवीन अडचणी येऊ शकतात. काही व्यक्तींचे व्यवहार रद्द होऊ शकतात. या कालावधीमध्ये वाद-विवादापासून लांब राहणे चांगले आहे. काही चुकीच्या कामामुळे कोर्टकचेरी होऊ शकते. पोलीस दल किंवा सैन्यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना जास्त कामाचा ताण वाढणार आहे. अचानक शुभ समाचार मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामांमध्ये नवीन व सकारात्मक दिशा मिळणार आहे. सरकारी नोकरी करणाऱ्यांना बढती मिळेल. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. आर्थिक व्यवहार चांगले होऊन, पैशाची आवक चांगली होणार आहे.

### व्यवसाय वाढीसाठी प्रयत्नशील राहाल

**सिंह**

या सप्ताहामध्ये व्यापार व्यवसायाची सुरुवात मध्यम गतीने होणार आहे. जसा जसा कालावधी पुढे जाईल तशी व्यापार-व्यवसायात प्रगती होणार आहे. आपण व्यवसाय वाढीसाठी प्रयत्नशील राहाल. नवीन प्रोजेक्टवर काम सुरू होण्याची शक्यता आहे. ज्यांचा व्यवसाय पारंपरिक आहे त्यांना चांगले परिणाम दिसायला लागतील. नोकरी करणाऱ्यांना पण हा कालावधी चांगला असणार आहे. वरिष्ठांची मर्जी असणार आहे. नोकरी-व्यवसायातील टारगेट पूर्ण करण्यासाठी आपण सक्षम आहात. कर्मचारी वर्गाची आपले चांगले संबंध असणार आहेत. आर्थिकदृष्ट्या आपली परिस्थिती चांगली असणार आहे. कल्पनाशक्तीला वाव मिळणार आहे.

### महत्त्वाची कामे करून घ्या

**कन्या**

वाद-विवाद वाढवू नका. इतके की घरातील एखादे मंगल कार्य पुढे टाकावे लागेल. आपण कोणाकडून कर्ज घेतले असेल, तर ते फेडण्यासाठी परत परत मागणी होईल. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये महत्त्वाची कामे करून घ्या. यामध्ये आपल्याला स्त्री वर्गाचे सहकार्य मिळणार आहे. आर्थिक लाभाचे प्रमाणही वाढणार आहे. वरिष्ठ जर स्त्री वर्ग असेल तर दुधात साखरच पडणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रात कोणतेही काम विचारपूर्वकच करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. शेअर बाजार, तेजी मंदी, सोने-चांदी या व्यवसायामध्ये लाभकारी व्यवहार होऊ शकतात.

### आनंदाची झलक निर्माण होईल

**तूळ**

सप्ताहाची सुरुवात सुखद क्षणांनी होणार आहे. आपल्या चेहऱ्यावर आनंदाची झलक निर्माण होणार आहे. आपल्यासाठी आपला जोडीदार व मुले आपली प्रत्येक मागणी पूर्ण करणार आहेत. आपल्या मुलांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. चुकीच्या संगतीमध्ये राहत नाहीत ना, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जोडीदारामधील सकारात्मक बदल आपणास जाणवणार आहे. घरातील चहाच्या पेल्यातील वादळे समाप्त होणार आहेत. सप्ताहाच्या मध्यावधीमध्ये व्यापार व्यवसाय उत्तम चालणार आहे. नोकरी करणाऱ्या व्यक्तींना नवीन नोकरीच्या संधी येऊ शकतात. कामांमध्ये प्रगती होणार आहे. आपल्या प्रयत्नांना चांगले यश मिळणार आहे.

### प्रकृतीची काळजी घेणे आवश्यक

**वृश्चिक**

ऑफिसमध्ये आपणास स्टाफ वाढवण्याची गरज भासणार आहे. महिलांसाठी हे दिवस थोडे कडू-गोड असण्याची शक्यता आहे. ज्या महिला बाहेर नोकरी-व्यवसाय करतात त्यांना दोन्हीकडे कामाचा ताण असणार आहे. घरीपण पाहुण्यांची ये-जा असेल आणि आपल्या कार्यक्षेत्रामध्ये सुद्धा काम जास्त करावे लागेल. यासाठी आपण योग्य ती स्वतःची प्रकृतीची काळजी घेणे आवश्यक आहे. ज्या व्यक्ती कलाक्षेत्रात खेळामध्ये आहे, तसेच स्पर्धांमध्ये यश येणार आहे. या कार्यक्षेत्रातील लोकांना चांगल्या प्रकारे सफलता मिळणार आहे. गुढ अभ्यास तसेच अध्यात्मामध्ये आवड निर्माण होणार आहे.

### परिश्रमाला पर्याय नाही

**धनू**

वैवाहिक जीवनात थोडी वादावादी, कलह होण्याची शक्यता निर्माण होणार आहे. तसेच आपल्या जोडीदाराची तब्येत कमजोर असू शकते. तसेच आपल्या स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेणे आवश्यक आहे. काही कालावधीत आपण भावुक होणार आहात, तर त्यावेळी दोघेही एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहात. यावेळेस एकमेकांबद्दल विचार करून आनंदी जीवन जगाल. प्रेमिकांनी एकमेकांना मजेमध्ये सुद्धा दुखावू नका. अत्यंत परिश्रमानंतर आपणास यश मिळणार आहे. त्यामुळे परिश्रमाला पर्याय नाही, प्रयत्नांती परमेश्वर याचा अनुभव घ्याल.

### आत्मविश्वासामध्ये वाढ होईल

**मकर**

ज्या व्यक्ती नोकरी करत आहेत त्यांच्यासाठी हा कालावधी अनुकूल आहे. आपणास बदली हवी असल्यास बदली होऊ शकते, तसेच पगारवाढ किंवा प्रमोशनचे योग आहेत. या कालावधीत आपणास अधिकार योग आहे. आपल्या आत्मविश्वासामध्ये वाढ होणार आहे. त्याचप्रमाणे आपली प्रगती निश्चित आहे. त्याचप्रमाणे अधिक कामाने प्रकृती बिघडण्याची शक्यता आहे किंवा जुने आजार वर तोंड काढण्याची शक्यता आहे. डायबेटिस, हृदयविकार असेल त्यांनी आपल्या प्रकृतीकडे नीट लक्ष द्यावे. आपल्या भौतिक सुख-सुविधांमध्ये वाढ होणार आहे. राहणीमान आपले उंचावणार आहे.

### प्रगती होईल

**कुंभ**

आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या गुणाने, कार्यकौशल्याने प्रगती समोर दिसून येत आहे. आपल्या जबाबदाऱ्या तुम्ही चांगल्या तऱ्हेने पार पाडत आहात. पण याच कारणाने शत्रू तोंड वर काढणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रात आजूबाजूचे लोक यांच्याशी आपण गोडीगुलाबीने राहावे. आपल्या भावनांवर आवर घालणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी व्यक्तींशी चांगले संबंध ठेवणे आवश्यक आहे. आपले आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनामध्ये सुद्धा वातावरण बिघडण्याची शक्यता आहे. आपल्यामध्ये दुरावा निर्माण होण्याची शक्यता आहे.

### उल्लेखनीय यश

**मीन**

आपणास चांगले यश मिळणार आहे. आपल्याला भाग्याची साथ असणार आहे. या कालावधीमध्ये आपणास उल्लेखनीय यश मिळणार आहे. जर आपण सरकारी कामात असाल तर लोकांचा विश्वास तसेच यश, आपली स्वतःची नवीन ओळख निर्माण करणारा हा कालावधी आहे. आपल्याला प्रसिद्धी मिळणार आहे. मान-सन्मानामध्ये वृद्धी होणार आहे. आपण आपल्या विरोधी पक्षांना मात देणार आहात. धनलाभाचे चांगल्या प्रकारे योग आहेत. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्यक्षात विचारविनिमय आणि सामंजस्याने प्रश्न सोडवलेले चांगले.




जगणे व्हावे
इतुके सुंदर
पाकळी पाकळी
उमलून यावी
सुगंध जावा
शोधित वाटा
कुणा न बोचावा
कधीच काटा

सोबत असता
हिरवे पर्ण
तसे असावे
मनही सुंदर
मातीला मी
घट्ट धरावे
मातीतच मी
मिसळून जावे

सुगंधी फुलाची
एक पाकळी
मातीवर कधी
सहज पडावी
जगणे व्हावे
इतुके सुंदर
पाकळी पाकळी
उमलून यावी!

\- शुभांगी मांडे खारकर

---

## शब्द धुंद जाहले

उतरुनी आले अधरी
काव्य का स्फूर्त असे
मधाळल्या शब्दांवरी
कधी वसे मोरमनी
अंगणी नाचे थुई थुई
पावसाच्या सरी येता
मोहरते मी जाई परी
मोगऱ्याचं गंध सेवी
उमलते मी फुलारी
सोनचाफा सारखा तू
दरवळशी मग अंतरी
तुझ्या निळाईत सख्या
होतसे मी कृष्णामयई

प्राजक्ताच्या सड्यांमध्ये
भेटते मज रूकमिनी
कधी मंत्रमुग्ध करी
कान्हा तुझी बासरी
राधेवीना कान्हा ही
कल्पनाच खरी अधुरी

\- दीपाली पंडित, राजापूर

# काकूंचा शैक्षणिक वारसा नव्या पिढीकडे

**निवड:** नवगण,विनायक शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या बीड येथील नवगण शिक्षण संस्था आणि विनायक युवक कल्याण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांची निवड गुरुवारी (दि.१९) करण्यात आली आहे. त्यांच्या रुपाने उच्चशिक्षित व्यक्तिमत्वाकडे शिक्षण संस्थांची धुरा सोपविण्यात आली असून त्यांचे निवडीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. बीडमध्ये नवगण शिक्षण संस्थेची स्थापना १९६३ साली लोकनेत्या व माजी खासदार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांनी केली. त्याकाळी जिल्ह्यातील ग्रामीण व डोंगराळ भागात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत अपुऱ्या होत्या. ही गरज ओळखून काकूंनी शेतकरी, ऊसतोड कामगार, गरीब व वंचित मुला -मुलींसाठी विविध शाळा व महाविद्यालयांची स्थापना करून शिक्षणाचा दिवा ग्रामीण भागात तेवत ठेवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेने लावलेले शैक्षणिक रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. पहिल्यांदा संस्थेच्या सचिवपदी ३१ डिसेंबर १९६५ रोजी भागुजीराव सनगर, १९६८ मध्ये केशरकाकू क्षीरसागर, १९७७ मध्ये सोनाजीराव क्षीरसागर, १९८७ मध्ये भारतभूषण क्षीरसागर यांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता सन २०२५ मध्ये सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर यांची निवड झाली. सध्या नवगण शिक्षण संस्थेअंतर्गत बीड जिल्ह्यातील विविध भागात ५ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, सैनिक विद्यालय, आश्रमशाळा, उर्दू शाळा प्रत्येकी १, ६ उच्च माध्यमिक शाळा, १० माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, व्यवसाय अभ्यासक्रम केंद्रे प्रत्येकी २ अशा विविध प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये एकूण सुमारे ६०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच, याशिवाय १९८४ साली स्थापन झालेल्या विनायक युवक कल्याण संस्थेमार्फत ३ माध्यमिक शाळा, २ प्राथमिक शाळा चालविल्या जातात. येथे सुमारे ५० कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी अंदाजे १००० विद्यार्थी शिक्षण घेतात. याआधी संस्थेचे सचिवपद डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी समर्थपणे सांभाळले. दरम्यान, आता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने मिळालेले नव्या दमाचे नेतृत्व, आधुनिक शिक्षणदृष्टी यामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत अधिक सकारात्मक परिवर्तन होईल, अशी अपेक्षा व्यक्ती केली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे सर्व संचालक

> नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शहर, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा संस्थेचा मूलमंत्र राहिला आहे. या परंपरेत सातत्य राखून संस्थेचा विस्तार व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी कटिबद्ध राहू. अधिकाधिक शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रम आणण्यासाठी प्रयत्न करू. तसेच, संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातील.
>
> **डॉ.योगेश क्षीरसागर**

## योगदिन...



**बीड:** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शनिवारी जागतिक भाजपकडून योग दिन साजरा करतांना, आ.संजय केनेकर, शंकर देशमुख, सर्जेराव तांदळे आदी.

# गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:एन एस एल शुगर लिमिटेड युनिट ३ जय महेश पवारवाडी, एनएसआय कानपूर , ॲडव्हान्टा कंपनी, खउ-ठ-खखचठ, इझउड्यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्रातील पहिलाच व्यावसायिक प्रकल्प अंतर्गत गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रम काल दिनांक १९ ६ २०२५ गुरुवार रोजी घेण्यात आला त्यामध्ये कंपनीच्या वतीने पुढील प्रमाणे माहिती/ प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात आली गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रमानिमित्त पंचक्रोशीतील ३०० शेतकऱ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला डव्हान्टा कंपनीचे मुख्य प्रतिनिधी श्री पांडुरंग पाटील यांनी स्वीट स्वारगम गोड ज्वारी लागवडीविषयी सखोल माहिती दिली यामध्ये त्यांनी ज्वारी लागवड पद्धत कीड व रोग नियंत्रण अंतर मशागत तसेच पाण्याचे व्यवस्थापन याबद्दल सर्व शेतकऱ्यांना माहिती सांगितली एन एस एल शुगर्स लिमिटेड जय महेश पवारवाडी कारखान्याचे जनरल मॅनेजर पारसनाथ जयस्वाल साहेब यांनी गोड ज्वारीपासून इथेनॉल निर्मिती होणार आहे याबाबत माहिती सांगितली या ज्वारीपासून शेतकऱ्यांना उत्पन्न देखील चांगले मिळते हे पीक ९० ते १०० दिवसाचेच असून शेतकऱ्यांनी याचा फायदा घ्यावा व रसा श्री दत्तात्रय आहेरकर ऊस पुरवठा अधिकारी रामभाऊ सोळंके भास्कर फपाळ यांनी देखील गोड ज्वारी लागवडी संदर्भातील माहिती शेतकऱ्यांना दिली व उपस्थित शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर त्यांना माहिती दिली अशा प्रकारे खेळीमेळीच्या

# ढाकेफळ जवळ कारचा अपघात

**दुर्घटना:** एकजण जागीच ठार दोघे जखमी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज - कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला शेळ्या चारणाऱ्या एका चौदा वर्षीय मुलाला धडक दिल्याने मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (ता. २०) रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अंबाजोगाई -केज रस्त्यावरील ढाकेफळ जवळ घडली. या अपघातात अपघातग्रस्त कार रस्त्याच्या कडेला जाऊन कारमधील दोघे जखमी झाले आहेत. जखमींवर केज व बीड रूग्णालयात उपचार सुरू आहेत.अंबाजोगाई -केज रस्त्याने बीडला जाण्यासाठी भरधाव वेगात निघालेल्या कारवरील (एमपी-०९/झेडजी-२८३७) चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला शेळ्या चारीत असलेल्या चौदा वर्षाच्या बाळू हरिदास काळे या मुलाला धडक दिली.

# वृक्षसंवर्धन हीच काळाची गरज!

**मनोज संकाये:** पर्यावरण प्रेमी केशवराव कुरुडेंचा गौरव

भगवानसाकसमुद्रे/परळी



परळी:शहर हे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यानी जीर्णोद्धार केलेले मंदिर आहे. पंचम ज्योतिर्लिंग वैजनाथ मंदिराच्या पूर्वेकडील श्री हरिहर तीर्थ ते रामनगर रोड परिसरात परळी नगर परिषदेच्या वतीने रस्त्याच्या दुतर्फा शेकडो झाडे लावण्यात आली आहेत. झाडे लावणे हा एक महत्त्वाचा टप्पा असतो, मात्र ती जगवणे आणि त्यांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारणे हे खरे आणि दीर्घकालीन योगदान असते. हीच जबाबदारी स्वतःहून, निस्वार्थ वृत्तीने पार पाडली आहे परळीतील वयोवृद्ध पर्यावरणप्रेमी केशवराव कुरुडे यानी. गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने दररोज सकाळी नदागोळ रोडवर फेरफटका मारण्यासाठी येणारे केशवराव कुरुडे या झाडांना पाणी घालतात, त्यांच्या आजूबाजूचा कचरा उचलतात व परिसर स्वच्छ ठेवतात. त्यानी ही जबाबदारी कोणत्याही सरकारी आदेशाशिवाय, कोणतीही आर्थिक अथवा सामाजिक अपेक्षा न ठेवता, पूर्णतः स्वयस्फूर्त भावनेतून उचलली आहे. वयाची सत्तरी ओलांडलेले असतानाही इतक्या जिद्दीने आणि नियमितपणे ही सेवा बजावणे हे निश्चितच समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरते. आज अनेक ठिकाणी झाडे लावली जातात, पण योग्य निगा नसल्यामुळे ती नष्ट होतात. परंतु कुरुडे याच्यासारख्या **पान दोन...**

# ...पण स्वागताला मात्र भाजपाचे कोणीच नाही

**उपक्रम:** सायकल वारी परळीत दाखल

पुण्यभूमी/प्रतिनिधी

परळी:आषाढी वारीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत अमरावती येथील ४५ पर्यावरणप्रेमी युवकांनी प्रदूषणमुक्त भारताचा संकल्प घेऊन काढलेली पर्यावरण रॅली परळीत दाखल झाली. महाराष्ट्राचे पर्यावरण मंत्री पद परळीकडे अर्थातच नामदार पंकजाताई मुंडे यांच्याकडे आहे. मात्र पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या या रॅलीचे स्वागत करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने कोणीच उपस्थित नसल्याचे दिसले. यावेळी वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते सर्वांचे पुष्पहार व प्रभुवैद्यनाथाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

वाढते प्रदूषण, निसर्गाचा ऱ्हास आणि बदलते हवामान या पार्श्वभूमीवर समाजात जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी अमरावतीच्या युवकांनी एकत्र येत ही सायकल वारी सुरू केली. प्रभू श्री वैद्यनाथाच्या चरणी प्रदूषणमुक्त भारत या संकल्पाची त्यांनी प्रार्थना केली.या प्रेरणादायी उपक्रमाचे स्वागत श्री वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी केले. त्यांनी सर्व युवकांचे पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज संकाये, माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, इंजिनियर मुकुंद देशपांडे, प्रकाश जोशी, पत्रकार बालाजी ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी श्री वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख म्हणाले, पर्यावरण रक्षणासाठी युवकांनी घेतलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत दिशादर्शक आहे.

# प्रशासनाची पारदर्शकतेकडे वाटचाल

**धोरण:** जिल्हाधिकारी थेट पाटोदा तहसीलमध्ये दाखल



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन, भा.प्र.से. यांनी नुकतीच पाटोदा तहसील कार्यालयास अचानक भेट देऊन प्रशासनातील विविध कामकाजाचा आढावा घेतला. तहसीलदार श्री. दत्तात्रय निलवाड यांच्यासह त्यांनी स्थानिक यंत्रणेच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा केली.यावेळी त्यांनी जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी जनता दरबार आयोजित करण्याचे निर्देश दिले. तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दस्तऐवज कमीत कमी कालावधीत उपलब्ध व्हावेत यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेशही दिले. शासकीय कार्यालयीन वेळेत सर्व कर्मचारी उपस्थित राहावेत यासाठी बायोमेट्रिक प्रणाली राबविण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असून, लवकरच ही प्रणाली तहसील कार्यालयात सुरू होणार आहे. यामुळे कामकाजात शिस्त व पारदर्शकता येणार असल्याचे ते म्हणाले. याचवेळी श्रावण बाळ योजना, शिधापत्रिका वाटप, विविध समित्यांच्या **पान दोन...**

# कलेक्टर साहब क्या बात है, मान गए आपको

**दिलासा:** सालेहा जिलानी शेख यांच्या मागणीला यश



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी सुलभ शौचालय नसल्याने महिलांची होणारी गैरसोय दूर करावी व नवीन सुलभ शौचालय बांधून द्यावे अशी मागणी बीड जिल्हा समाजवादी पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा सालेहा जिलानी शेख यांनी केली होती. महिलांना भेडसावणाऱ्या या प्रश्नाचे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तात्काळ दखल घेत जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा व विविध कार्यालयांना महिलांसाठी नवीन सुलभ शौचालय बांधावीत अशा प्रकारचे लेखी आदेश दिले आहेत.

बीड जिल्ह्यात तहसील कार्यालये, नगरपरिषद, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती आदी महत्त्वाच्या शासकीय कार्यालयात तसेच व्यापार पेठेत महिलांसाठी सुलभ शौचालयांचा अभाव आहे आणि जे काही मोजकेच सुलभ शौचालय उपलब्ध आहेत तेही अत्यंत नादरुस्त झाली आहेत. तर काही ठिकाणी बंद पडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे शासकीय कामासाठी आणि बाजारपेठेत बाहेर पडणाऱ्या महिलांना मोठ्या गैरसोईला सामोरे जावे लागत होते.

महिलांच्या या प्रश्नावर समाजवादी पार्टी महाराष्ट्राच्या बीड जिल्हा महिला आघाडीचे अध्यक्षा सालेहा जिलानी शेख यांनी आवाज उठविला व बीड जिल्हाधिकाऱ्यांना या प्रश्नावर निवेदन दिले होते.सालेहा शेख यांच्या या महत्त्वपूर्ण निवेदनाची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तात्काळ दखल घेतली. व बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद कार्यालयांना सार्वजनिक बांधकाम विभागाला व इतर शासकीय कार्यालयांना लेखी आदेश देऊन ज्या ठिकाणी महिलांसाठी सुलभ शौचालय नाहीत अशा ठिकाणी नवीन सुलभ शौचालय बांधावीत तसेच जे बंद पडले आहेत त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधा निर्माण करून ते चालू करावेत. जिल्हाधिकाऱ्यांनी **पान दोन...**

# चोरी करुन चोरटे सुसाट सुटले पण मध्येच गाडीचे टायर फुटले

**थरार:** सिनेस्टाईल पाठलाग करून आवळल्या मुसक्या



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:येथील विनायक चौकातील कुशल मेडिकलचे चोरट्याने शटर लॉक तोडून दुकानातील गल्ल्यात ठेवलेले ६ हजार ५०० चोरून नेल्याची घटना काल १९ जूनच्या रात्री १०.३० सुमारास घडली होती. पोलिसांनी २४ तासाच्या आत घटनेचा तपास करून आरोपी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ७ लाख ६ हजार ४७० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कृष्णा सुदाम छेडीदार वय (३४), साहेबराव उर्फ बाप्पा पाराजी चाळक (५०), परमेश्वर अशोक गायकवाड (३०) असे तब्येत घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. शितलकुमार सुरजमल बोरा यांच्या लोणार शहरातील विनायक चौकात असलेल्या कुशल मेडिकल मध्ये काल १९ जूनच्या रात्री चोरटच्यांनी मेडिकलचे शटर फोडून ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. यासंदर्भातली तक्रार बोरा यांनी लोणार पोलिसात दिली होती. गस्तीवर असलेले अंमलदार ज्यांना मेडिकल समोर रंगाची ईरटीका गाडी **पान दोन...**